मुबंई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १४८ ■ गुरुवार, ०५ फेब्रुवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# मुंबई पुणे महामार्ग की 'पार्किंग प्लेस'

## 25-26 तासानंतरही कोंडी कायम!; द्रुतगती मार्गावर प्रवाशांची घुसमट

**पुणे :** मुंबई - पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावर मंगळवारी सायंकाळी घडलेल्या भीषण अपघातानंतर तब्बल 25 तास उलटून गेले तरीही परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आलेली नाही. आडोशी बोगद्याजवळ गॅस टँकर पलटी झाल्यामुळे निर्माण झालेल्या या संकटानं संपूर्ण महामार्गावरील वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा उडाला आहे. सुरक्षेच्या दृष्टीनं प्रशासनानं तत्काळ दोन्ही बाजूंची वाहतूक थांबवली. परिणामी पुणे आणि मुंबई या दोन्ही दिशांना वाहनांच्या 15 ते 20 किलोमीटरपर्यंत लांबच लांब रांगा लागल्या असून हजारो प्रवासी या कोंडीत अडकून पडले आहेत.





**अपघातानंतर टँकरमधून गॅस लिकेज :** अपघातानंतर टँकरमधून सतत गॅस लिकेज सुरू असल्यामुळे परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. अग्निशमन दल, महामार्ग पोलीस, स्थानिक पोलीस, आपत्ती व्यवस्थापन पथके तसेच संबंधित कंपनीचे तांत्रिक कर्मचारी घटनास्थळी तातडीने दाखल झाले आहेत. गॅस लिकेज थांबवणे, टँकर सुरक्षित ठिकाणी हलवणे आणि परिसर निर्जंतुक करणे यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, प्रशासनाच्या वतीने पलटी झालेला गॅस टँकर अत्यंत ज्वलनशील असल्यानं त्यातील गॅसची तीव्रता कमी करून तो दुसऱ्या टँकरमध्ये शिफ्ट करण्याची प्रक्रिया राबवली जाणार असल्याची माहिती प्रवासी आणि प्रशासनाकडून मिळत आहे. मंगळवारी संध्याकाळी साडे सहाच्या सुमारास अग्निशमन दलाकडून पाण्याच्या फवारणीद्वारे गॅस गळतीची तीव्रता काही प्रमाणात कमी करण्यात आली होती. सध्या देखील प्रशासनाकडून जमेल तेवढे शक्य ते सर्व प्रयत्न करून परिस्थिती नियंत्रणात आणण्याचे काम सुरू आहे.

**पुण्याहून मुंबईच्या दिशेने जाणारी लेन मोकळी :** मावळ तालुक्यातील उर्से टोल नाक्याजवळ पुण्याहून मुंबईच्या दिशेने जाणारी लेन मोकळी करण्यात आल्यानं वाहनचालकांना काहीसा दिलासा मिळाला आहे. आज सकाळी सात वाजल्यापासून येथे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी निर्माण झाली होती आणि शेकडो वाहने तासन्तास अडकून पडली. लेन सुरू होताच हळूहळू वाहतूक सुरळीत होऊ लागली असून वाहनचालकांनी मोकळा श्वास घेतला आहे. आज दुपारी प्रशासनानं काही प्रमाणात दिलासा देत पुण्याहून मुंबईच्या दिशेनं एक लेन आणि मुंबईहून पुण्याच्या दिशेनं दोन लेन वाहतुकीसाठी खुल्या केल्या आहेत. त्यामुळे काही वाहनांची हालचाल सुरू झाली असली तरीही कोंडी पूर्णपणे सुटलेली नाही. अनेक ठिकाणी अजूनही वाहनांच्या रांगा असून प्रवाशांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागत आहे.

**लांब पल्ल्याच्या प्रवाशांना सर्वाधिक फटका :** या वाहतूक कोंडीचा सर्वाधिक फटका लांब पल्ल्याच्या प्रवाशांना, खासगी बसेस, मालवाहतूक वाहनांना तसेच अत्यावश्यक सेवांशी संबंधित वाहनांना बसत आहे. अनेक प्रवासी पाणी, अन्न आणि शौचालयाच्या सुविधांशिवाय अडकून पडल्याने नाराजी व्यक्त करत आहेत. काही ठिकाणी नागरिकांनी एकमेकांना मदतीचा हात देत पाणी व अन्न वाटप केल्याचेही चित्र दिसत आहे. प्रशासनाकडून वाहनचालकांना अजूनही पर्यायी मार्गांचा वापर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. तसेच परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आल्यानंतरच महामार्गावरील सर्व लेन खुल्या करण्यात येतील, असं स्पष्ट करण्यात आले आहे. दरम्यान, या घटनेमुळे द्रुतगती मार्गावरील आपत्ती व्यवस्थापन आणि सुरक्षाव्यवस्थेबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी ठोस उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

**वाहतूक कोंडीची उपमुख्यमंत्र्यांकडून गंभीर दखल :** मुंबई पुणे द्रुतगती महामार्गावर बोरघाटात गॅस टँकरच्या अपघातामुळे मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होऊन वाहन चालकांना झालेल्या त्रासाची गंभीर दखल उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी घेतली. या पुढील काळात अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही यासाठी विशेष आपत्कालीन वाहतूक आराखडा मुंबई पुणे द्रुतगती महामार्गासाठी तयार करण्याचे निर्देश एमएसआरडीसी त्याचप्रमाणे पोलिसांना त्यांनी दिले आहेत. गॅस टँकर उलटल्यामुळे ज्वलनशील प्रोपोलीन गॅसची गळती सुरू झाली होती. या गळतीमुळे धोका आणखी वाढून मोठे नुकसान झाले असते, त्यामुळे वाहतुकीचे नियोजन करण्याशिवाय पर्यायच नव्हता. द्रुतगती महामार्गावरील वाहतूक जुन्या महामार्गाकडे वळवावी लागली. शिवाय एमएसआरडीसी आणि पोलिसांनी अथक २० तास प्रयत्न करून गॅस गळती सुद्धा रोखली आहे. प्रवाशांना झालेला त्रास दुर्दैवी आहे. त्यांना झालेल्या मनस्तापाची पूर्ण कल्पना आहे, पण एमएसआरडीसीने सुद्धा तातडीने राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची कुमक मागवली. त्यांनीही प्रयत्न केले. मात्र हे काम खूप आव्हानात्मक होते. जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. त्यामुळे भारत पेट्रोलियम, हिंदुस्तान पेट्रोलियम आणि रिलायन्स कंपनीच्या तज्ज्ञांना बोलवण्यात आलं. या पथकांनी गॅस गळतीवर नियंत्रण मिळवलं. दरम्यान प्रवाशांना एमएसआरडीसी कडून मोठ्या प्रमाणावर पिण्याचे पाणी, बिस्किट्स देण्यात आले.

सर्व अधिकारी कर्मचारी रस्त्यावर होते. एवढेच नाही तर पथकर वसुली करू नये म्हणून देखील निर्देश मी दिले असल्याचे उपमुख्यमंत्री म्हणाले. वाहतूक व्यवस्था पूर्वपदावर येईपर्यंत या महामार्गावरील टोल वसूली थांबविण्याचे निर्देशही उपमुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.

## वासांबे जि.प.गटात महायुतीचा मजबूत पाया; तिन्ही उमेदवार प्रचंड मताधिक्यांनी विजयी होतील - कैलास म्हात्रे

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी) :** ७ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वासांबे जिल्हा परिषद गटात महायुतीची संघटनात्मक ताकद आणि जनसंपर्क प्रभावीपणे जाणवत असून मतदारांचा कल विकासाभिमुख नेतृत्वाकडे असल्याचा विश्वास महायुतीचे नेते कैलास म्हात्रे यांनी प्रतिनिधींशी बोलतांना व्यक्त केला.



वासांबे जिल्हा परिषद गटातून महायुतीच्या उमेदवार नेहा भूषण पारंगे, पंचायत समितीसाठी अर्चना भोईर, तर रीस पंचायत समिती गणातून कृष्णाशेठ गंगाराम पारंगे हे उमेदवार निवडणूक रिंगणात उतरले असून तिन्ही ठिकाणी सकारात्मक वातावरण असल्याचे चित्र दिसत आहे. भाजप,शिवसेना (शिंदे गट) आणि आरपीआय(आठवले गट)यांच्या एकजुटीमुळे महायुतीची संघटनात्मक रचना अधिक भक्कम झाली आहे. गावोगावी प्रचार दौऱ्याला चांगला प्रतिसाद मिळत असून मतदारांशी थेट संवादावर भर दिला जात आहे.

कैलास म्हात्रे पुढे म्हणाले की, समाजकार्यासाठी कंबर कसून काम करणारे उमेदवार आम्ही दिले आहेत. विकासाचे एकच नाव.. नेहा पारंगे,अर्चना भोईर आणि कृष्णाशेठ पारंगे ही नावे म्हणजे विकासाची हमी आहेत. त्यांच्यामागे भाजपसारखा सक्षम पक्ष ठामपणे उभा आहे.मतदारांनी विकासाला प्राधान्य देत महायुतीला साथ द्यावी.

नेहा पारंगे यांचे महिला सबलीकरणातील कार्य, अर्चना भोईर यांची तळागाळातील ओळख आणि कृष्णाशेठ पारंगे यांचा दांडगा जनसंपर्क या बाबी मतदारांमध्ये विश्वास निर्माण करणाऱ्या ठरत आहेत. गावपातळीवरील कार्यकर्ते, महिला मंडळे,युवक-युवती आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने प्रचारात सहभागी होत असून वातावरण निवडणूक प्रक्रियेबाबत उत्साही व सकारात्मक आहे. काम,विश्वास आणि विकास- महायुतीचा निर्धार"असा संदेश मतदारांपर्यंत पोहोचत आहे.

## खारघर येथील इज किड्स शाळेचा ' आशिया ' वार्षिक वर्धापन दिन उत्साहात पार पडला

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिध / नवीन पनवेल :** विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी त्यांच्या हक्काचे व्यासपीठ म्हणजे वार्षिक स्नेहसंमेलन मेळावा. खारघर येथील इज किड्सच्या शाळेचा आशिया वार्षिक वर्धापन दिन खारघर येथील रामशेठ ठाकूर कॉलेज ऑफ सायन्स च्या मैदानात पार पडला.शिक्षक पालक आणि विद्यार्थ्यांच्या एकत्रित सहभागामुळे या कार्यक्रमांमध्ये रंगत आली. शाळेचा यंदाचा हा आठवा वार्षिक स्नेहसंमेलन मेळावा असून यंदा 90 मुलांनी यात भाग घेतला होता. व्यासपीठावरील मुलांच्या मस्तीने पालक आणि शिक्षकांनीही या कार्यक्रमाचा आनंद लुटला. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित विद्यार्थ्यांचा गुणगौरव व पारितोषिक देण्यात आले .कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. यावेळी शाळेच्या संस्थापिका अपर्णा पटेल, रजनीकांत पटेल, शिक्षक ,विद्यार्थी आणि विद्यार्थी पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका दर्शा पटेल यांनी केले.




## महाशिवरात्रीला पहिल्यांदाच घृष्णेश्वराचा गाभारा बंद; मोबाईल अन् कॅमेऱ्यालादेखील बंदी

**छत्रपती संभाजीनगर :** राज्यात १५ फेब्रुवारीला सर्वत्र महाशिवरात्री मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे. त्यानिमित्त सर्वच महादेव मंदिरात तयारी सुरू झालीय. १२ ज्योतिर्लिंगांपैकी शेवटचे देवस्थान असणाऱ्या घृष्णेश्वर मंदिरात देखील तयारीला सुरुवात झालीय. देश-विदेशातून मोठ्या संख्येनं भक्त घृष्णेश्वराच्या दर्शनासाठी येत असतात. त्यामुळं भाविकांना घृष्णेश्वराचं विनाअडथळा दर्शन घेता यावं, यासाठी गाभाऱ्यातील दर्शन बंद ठेवण्यात येणार असल्याचा निर्णय श्रीघृष्णेश्वर देवस्थान ट्रस्ट, जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि लोकप्रतिनिधी यांच्या झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

वेरूळ येथील १२वे ज्योतिर्लिंग असलेल्या घृष्णेश्वर मंदिरात महाशिवरात्रीसाठी तयारी सुरू झालीय. मंदिर परिसरात येणाऱ्या लाखो भाविकांना सुलभ दर्शन मिळावं यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत. उपाययोजना करण्यासाठी वेरूळ इथं जिल्हा प्रशासनानं बैठक आयोजित केली. यामध्ये श्रीघृष्णेश्वर देवस्थान ट्रस्ट आणि प्रशासनाची बैठक झाली. यावेळी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, पोलीस अधीक्षक विजय राठोड उपस्थित होते.

“भाविकांना लवकर दर्शन मिळावं, यासाठी पहिल्यांदाच गाभाऱ्यातील दर्शन यात्रेच्या काळात बंद ठेवण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. सर्व भाविकांना बाहेरूनच दर्शन घ्यावं लागणार आहे. मात्र वेरूळ परिसरातील ग्रामस्थांना पहाटे ४ ते सकाळी ७ या काळात ओळखपत्र दाखवून थेट मंदिरात प्रवेश दिला जाणार आहे, अशी माहिती तहसीलदार संतोष गुट्टे यांनी बैठकीत दिली.

यात्रेच्या दरम्यान परिसरात अनेक दुकान रस्त्यावर थाटली जातात. यावेळी ती दुकानं किमान पाच ते दहा फूट मागं लावण्याच्या सूचना दिल्या आहेत.

## जोगेश्वरीत संजय स्पोर्ट्स अकॅडमीची मिनी मॅरेथॉन यशस्वी

**दैनिक युवक आधार**
**किशोर रमाकांत गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख :** जोगेश्वरी (पूर्व) : जोगेश्वरी येथे रविवार, दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी संजय स्पोर्ट्स अकॅडमी यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य अंतरशालेय मिनी मॅरेथॉन स्पर्धेला विद्यार्थ्यांकडून मोठ्या प्रमाणावर उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या क्रीडा उपक्रमात जोगेश्वरी परिसरातील तब्बल १८ शाळांमधील सुमारे १४०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून परिसरात क्रीडाप्रेमी व उत्साही वातावरण निर्माण केले.

ही मिनी मॅरेथॉन संजय स्पोर्ट्स अकॅडमीचे संस्थापक व सुप्रसिद्ध मॅरेथॉन धावपटू श्री. संजय चिंदरकर यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडली. गेल्या अनेक वर्षांपासून अखंडपणे हा उपक्रम राबवण्यात येत असून विद्यार्थ्यांमधील सुप्त क्रीडागुणांना चालना देणे, आरोग्याविषयी जनजागृती करणे तसेच खेळाकडे सकारात्मक दृष्टिकोन विकसित करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.स्पर्धेची सुरुवात सकाळी उत्साहपूर्ण वातावरणात झाली. इयत्ता १ ली ते ९ वीपर्यंतच्या मुला-मुलींसाठी विविध वयोगटांनुसार धावण्याचे अंतर निश्चित करण्यात आले होते. शिस्तबद्ध नियोजन, सुरक्षिततेच्या दृष्टीने केलेली व्यवस्था तसेच स्वयंसेवकांचे सहकार्य यामुळे स्पर्धा सुरळीत पार पडली. विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षक, पालक आणि स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धावपटूंना प्रोत्साहन दिले.या स्पर्धेचे प्रमुख प्रायोजक म्हणून इंडियन ऑइल यांनी मोलाचे सहकार्य केले. त्यांच्या सहकार्यामुळे विद्यार्थ्यांसाठी पाणी, आरोग्यविषयक मदत तसेच पारितोषिकांची व्यवस्था करण्यात आली. इंडियन ऑइलसारख्या प्रतिष्ठित संस्थेच्या सहभागामुळे क्रीडा उपक्रमाला अधिक बळ मिळाल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.




स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत अस्मिता विद्यालयाने सर्वाधिक गुणांसह विजेतेपद पटकावले. विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. या कार्यक्रमाला जोगेश्वरी पोलिस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.समारोपप्रसंगी मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच खेळालाही तितकेच महत्त्व द्यावे, असे आवाहन केले. अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होऊन क्रीडाभावना, शारीरिक तंदुरुस्ती आणि संघभावना वृद्धिंगत होते, असेही त्यांनी नमूद केले. या यशस्वी आयोजनाबद्दल संजय स्पोर्ट्स अकॅडमीचे सर्वत्र कौतुक होत असून भविष्यातही असे उपक्रम सातत्याने राबवण्याचा संकल्प आयोजकांनी व्यक्त केला.

# सामाजिक उपक्रमांतून वृद्धिंगत केली गेट-टुगेदर ची गोडी; बी एस स्सी ९७ बॅच चे चौथे गेट-टुगेदर उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी :** येथील रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले आर्ट्स सायन्स अँड कॉमर्स कॉलेजमधून १९९७ साली पदवी प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांचे सलग चौथे गेट-टुगेदर १ फेब्रुवारी रोजी लोणीवली येथे उत्साहात संपन्न झाले. तब्बल २९ वर्षांपूर्वी क्लासमेट असणाऱ्या या तमाम सवंगड्यांनी अजूनही मैत्रीची वीण घट्ट ठेवली असल्याचे या सोहळयात दिसून आले. विशेष उल्लेखनीय म्हणजे गेट-टुगेदर मधील धम्माल मस्ती करत असताना या बॅचमधील सवंगड्यांनी सामाजिक उपक्रम राबवत गेट-टुगेदर ची गोडी वृद्धिंगत केली आहे.

लोणीवली येथील निसर्गरम्य वातावरणातल्या सृष्टी फार्म हाऊस वरती १९९७ साली बी एस सी झालेले सवंगडी जमले होते. तत्पूर्वी नजीकच्या विश्वधर्म वारकरी सामाजिक संस्था यांना या बॅचमेट्स ने शौचालय उभारणी करता आर्थिक सहाय्य केले होते. या अर्थसहाय्यातून सदरच्या आश्रमात शिकणाऱ्या ४५ विद्यार्थ्यां करता ४ सीट चे शौचालय बनवण्यात आले आहे. चार वर्षांपूर्वी या बॅचमधील विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून तसेच जनसंपर्काच्या माध्यमातून आपल्या सोबत उत्तीर्ण झालेल्या सवंगड्यांचे नंबर मिळवून त्यांचा एक व्हाट्सअप ग्रुप तयार केला. तब्बल २६ वर्षानंतर मैत्रीचा मळा फुलला होता. चार वर्षांपूर्वी, वर्षातून किमान एकदा तरी भेटायचेच हा चंग बांधत हे बॅचमेट्स त्याच्या माध्यमातून सामाजिक कार्य देखील करत आहेत.

वारदोली येथील विश्वधर्म वारकरी सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ह भ प रामायणाचार्य संजय महाराज पाटील यांनी ९७ बॅचमेट मधील राजेश हुद्दार यांच्याकडे त्यांच्या आश्रमातील मुलांना शौचालयाची अत्यंत गरज असल्याचे कळविले. येथील लहान लहान मुलांना नैसर्गिक विधीसाठी उघड्यावर जावे लागत असायचे. राजेश हुद्दार यांनी ही संकल्पना आपल्या सवंगड्यासमोर मांडतच बॅचमेटसनी त्वरित प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद दिला.९७ बॅचमेट मधील सवंगड्यांनी यथाशक्ती आर्थिक हातभार लावत तब्बल ४५ हजार रुपये जमवून विश्वधर्म वारकरी सामाजिक संस्थेला दिले होते त्यामधून चार सीटच्या




शौचालयाचे बांधकाम पूर्ण झालेले आहे.

९७ बॅचमेट यांनी एका सजग सामाजिक उपक्रमाला हातभार लावल्याबद्दल ह भ प रामायणाचार्य संजय महाराज पाटील यांनी आभार व्यक्त केले तसेच ९७ बॅचमेट यांचा शाल व श्रीफळ देऊन गौरव केला. योगेश वाणी यांनी येथील मुलांना सकस आहार मिळावा या प्रामाणिक उद्देशाने अन्नदान केले.चौथ्या गेट-टुगेदर च्या सकाळच्या सत्रामध्ये सर्व बॅचमेट कॉलेजमध्ये जमा झाले होते विशेष उल्लेखनीय म्हणजे या बॅचमधील मुलींनी देखील या वेळच्या गेट-टुगेदर मध्ये सहभाग नोंदविला.

संध्याकाळच्या सत्रामध्ये या बॅचमधील सदस्य असणारे प्रशांत पाटील यांच्या सृष्टी फार्म हाऊसवर बॅचमेटसनी धम्माल मस्तीचा सोहळा अनुभवला. रिल्स बनवत,सेल्फी काढत आणि एकमेकांना आलिंगन देत मैत्रीची संध्याकाळ रंगत गेली. काही मित्रांनी निळयाशार तरणतलावामध्ये पोहण्याचा मनमुराद आनंद लुटला. कराओके सिंगिंगवर मित्रांची पावले थिरकू लागली.एक से बढकर एक गाणी सादर करण्याची जणू काही स्पर्धाच लागली होती. कोळी गीतांच्या तालावर सर्व मित्रमंडळी बेभान होऊन नाचले तर पारंपारिक पद्धतीने सादर झालेल्या बाल्या गीताच्या ठेक्यावर सगळयांनी बाल्या डान्सचे कसब एकमेकांना दाखवले. वालाच्या शेंगा, झणझणीत मांसाहारी आणि लझीझ शाकाहारी भोजनाचा आस्वाद सर्व मित्रांनी घेतला. उत्तर रात्री पर्यंत गप्पांचे फड रंगले. या गेट-टुगेदर साठी डोंबिवली ठाणे मुंबई येथून काही मित्रमंडळी आवर्जून उपस्थित राहिले होती तर जुन्या बॅचमेट्स ना भेटण्यासाठी अंकुश पाटील हे थेट दुबईहून खास सुट्टी घेऊन सहभागी झाले होते. रामदास होळ हे गुजरात राज्यातून खास गेट टुगेदर साठी उपस्थित राहिले होते.कमिटमेंट देऊन सुद्धा न येणाऱ्या मित्रांच्या नावाने लाखोल्या वाहून झाल्या. पुढच्या वर्षी गेट-टुगेदर ची प्रथा अशीच सुरू ठेवायची आणि सोबत सामाजिक उपक्रम देखील करत राहायचे असा चंग बांधत सर्व मित्रांनी आपापल्या घरची वाट धरली.

गेट-टुगेदर आयोजित करण्यासाठी समीर आंबवणे, किसन खारके, नंदकुमार मुंबईकर, राजेश हुद्दार,उदय शेळके, संतोष चौधरी, भालचंद्र गवंडी यांनी अथक परिश्रम घेतले.आनंद जितेकर यांनी भोजन व्यवस्थेकरता सढळ हस्ते अर्थसहाय्य दिले.प्रशांत पाटील यांनी त्यांचे सृष्टी फार्म हाऊस मित्रांकरता खुले करून दिले, वसंत भोईर उर्फ नाना यांनी इव्हेंट मॅनेजमेंट ची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली तर राजेश हुद्दार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांभाळले. या सोहळयामध्ये रमेश तुपे, अमोल गोवारी, विजय खिल्लारे, अनिल मोकल, सचिन देशमुख, गणेश घरत, मंदार करंदीकर, उदय लोटणकर, शिवाजी चव्हाण,योगेश वाणी,उदय शेळके, रामदास होळ, शंकर हुद्दार, अमित जोशी,नंदकुमार म्हात्रे, विनोद पाटील, शिवाजी चव्हाण, महादेव कांबळे, दत्ता म्हात्रे, सचिन देशमुख कृष्णा म्हात्रे, अनिल गोंधळी, आनंद जीतेकर, मंदार दोंदे,रमेश पाटील, नरेश खुटले, गुरुनाथ वालीलकर, सुनील पवार, रमेश तुपे घनश्याम भगत, सुनील खुटले, गिरीश देशमुख, संतोष मोकल, रवींद्र म्हात्रे, जीवन माळी, अभय पाटील, कमलाकर गोजे, योगेश आचार्य, राजा गोठल, तुषार यादव, गुरुदत्त कांबळे, केदार मुंडे, विनोद तारेकर, सुशीलकांत तारेकर, वासुदेव ठाकूर दिलीप आगलावे आदी सवंगड्यांनी गेट-टुगेदरचा मनमुराद आनंद लुटला.

## आम्ही वडाळा पूर्वकरच्या वर्धापन दिनी विविध पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन !

**दैनिक युवक आधार**

**मुबंई (दत्ता खंदारे /प्रतिनिधी) :** सृष्टी संस्थां प्रायोजित "आम्ही वडाळा पूर्वकर"च्या८ व्या वर्धापनदिनी विविध पुरस्काराचे वितरण मान्यवर व्यक्तीच्या हस्ते करण्यात येणार आहे.रविवार दिनांक ८फेब्रुवारी २०२६रोजी सायंकाळी ६वाजता मुंबई पब्लिक स्कूल,व्ही. जे.टी.आय कॉलेज समोर,वडाळा पश्चिम येथे हा सोहळा पार पडणार असून,सामाजिक, शैक्षणिक आणि साहित्यिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तीचा यावेळी जीवन गौरव आणि समाज रत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. तसेच श्री शिवाजी सुलोचना सत्यवान फणसेकर लिखित "ब्यांजो सूर ताल आयुष्याचे"या ४थ्या साहित्य पुष्पाचे प्रकाशन सुद्धा करण्यात येणार आहे.या पुरस्कार सोहळयास प्रमुख पाहुणे म्हणून रोहिदास लोखंडे (

नगरसेवक ),दत्ताराम दळवी( माजी अध्यक्ष मुंबई वृत्तपत्र लेखक संघ),भाऊ सावंत,( अध्यक्ष हुतात्मा स्मारक कमिटी),असुंता डिसोझा( सामाजिक कार्यकर्त्या),हेमलता सदाशिवम( सामाजिक कार्यकर्त्या),अनिल भाऊ कदम ( नगरसेवक),युसूफ दरबार,( जेष्ठ संगीतकार ब्यांजो वादक),अजय फणसेकर( चित्रपट दिर्गदर्शक,अभिनेते),दिपाली सचिन खेडेकर ( शिक्षिका ),सुधाकर काश्यप्य ( जेष्ठ पत्रकार),आनंद प्रभू ( जेष्ठ मनसे नेते)सुनील शिंदै ( जेष्ठ पत्रकार),भगवान भुसारा ( मुख्याध्यापक ) सुफियान वनू( माजी नगरसेवक ) उपस्थित राहणार आहेत.

# बौद्ध संस्थांसाठी आनंदाची बातमी! शासनाकडून थेट ₹१० लाखांपर्यंत अनुदान – २० फेब्रुवारीपर्यंत प्रस्ताव सादर करा!

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** बौद्ध समाजातील सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांसाठी राज्य शासनाने मोठा दिलासा देणारी योजना जाहीर केली आहे. सन २०२५–२६ या आर्थिक वर्षात अशा संस्थांना ₹१० लाखांपर्यंत अनुदान देण्याची योजना अल्पसंख्याक विकास विभागामार्फत राबविण्यात येत आहे.

धर्मदाय आयुक्तांकडे नोंदणीकृत आणि ज्या संस्थांमध्ये ५१ टक्क्यांपेक्षा जास्त विश्वस्त किंवा सदस्य बौद्ध समाजातील




आहेत, अशा संस्थांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. या अनुदानातून संस्थांना आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यासाठी मदत मिळणार आहे.

ही योजना शासन परिपत्रक दिनांक २७ जानेवारी २०२६ अन्वये राबविण्यात येत असून, इच्छुक संस्थांनी आपले परिपूर्ण मूळ प्रस्ताव दिनांक २० फेब्रुवारी २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, नियोजन भवन, वाशिम

येथे सादर करावेत.अर्ज करताना शासन निर्णय दिनांक ७ ऑक्टोबर २०२४ नुसार विहित केलेल्या अर्ज व प्रपत्रामध्येच अर्ज करणे बंधनकारक आहे. तसेच शासन निर्णयात नमूद केलेल्या १३ पायाभूत सुविधांपैकी आवश्यक सुविधांसाठीच ₹१० लाखांच्या मर्यादेत प्रस्ताव सादर करावा लागणार आहे. २० फेब्रुवारीनंतर आलेल्या प्रस्तावांचा विचार केला जाणार नाही.तसेच शासन नियमांनुसार अपात्र असलेल्या संस्थांनी अर्ज करू नये, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधित संस्थांनी वेळेत प्रस्ताव सादर करावा, असे आवाहनजिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी राजेश सोनखासकर यांनी केले आहे.

# रायगड जिल्हा परिषदेच्या सत्तेत कॉंग्रेस : महेंद्रशेठ घरत

## संविधान व राजकारणाचा भाजपने बट्ट्याबोळ केला जयंत पाटील यांचे मत

## मोदींना सर्वांची नावे पुसून टाकायची आहेत : हर्षवर्धन सकपाळ

**दैनिक युवक आधार**

**उलवे,वार्ताहर :** जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या प्रचाराला वेग आला आहे. मंगळवारी (ता. ३) कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष पहिल्यांदाच उरण आणि अलिबागमधील चोंढी येथे महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी मैदानात उतरले होते. यावेळी अलिबाग-चोंढी नाक्यावर महाविकास आघाडीची जाहीर सभा त्यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यावेळी शेकापचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील, रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत, सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, चित्रलेखा पाटील, राजाभाऊ ठाकूर, श्रुती म्हात्रे आदी मान्यवर होते.

यावेळी जयंत पाटील म्हणाले, "महाविकास आघाडी सर्व जागा जिंकणारच, तेही चांगल्या मताधिक्यांनी. सध्या टक्केवारीचे राजकारण फोफावले आहे. त्याविरोधात मी लढतोय. अलिबागचे यश कॉंग्रेस आणि शिवसेना यांचे असेल. हिंदू धर्मात घरातील कार्य ज्येष्ठ ठरवतात. दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मृत्यूनंतर तातडीने शपथविधी उरकून भाजपने महाराष्ट्राच्या संस्कृतीला काळिमा फासला. त्याबद्दल भाजपचा निषेध करतो. संविधान आणि राजकारणाचा त्यांनी बट्ट्याबोळ केलाय. त्याविरोधात



महाविकास आघाडी लढणार आहे. महेंद्रशेठ घरत यांच्या उत्तम कामगिरीचा मला अभिमान वाटतो."

यावेळी प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, "कॉंग्रेसचे पंतप्रधान सच्चा मनाचे होते. इंदिरा गांधी यांनी बॅंकांचे राष्ट्रीयीकरण केले. राजीव गांधी यांनी तंत्रज्ञान आणले. सत्तेचे विकेंद्रीकरण केले. खुली अर्थव्यवस्था स्वीकारली. लायसन्स राज संपवले. वाजपेयी यांचेही योगदान महत्त्वाचे आहे. कॉंग्रेसच्या पंतप्रधानांनी लोकशाही मजबूत केली. आपल्या बोथट भावनांचा फायदा घेतला जातोय. पैसा फेको तमाशा देखो असाच कारभार भाजपचा सुरू आहे. मुठ्ठीभर लोकांच्या हातात सत्ता आहे. मोदींना सर्वांची नावे पुसून टाकायची आहेत, म्हणूनच दिबांचे नाव अद्याप नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिले नाही. त्यांना फक्त अदानी आणि अंबानी हवेत."

यावेळी कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत म्हणाले, "चोंढीनाका ऐतिहासिक आहे. येथेच दिवंगत माजी आमदार मधुकर ठाकूर यांचा पाया भक्कम झाला. आपण हक्कांसाठी लढलेच पाहिजे. युवकांना नोकऱ्या दिल्या पाहिजेत. मी सिडकोच्या छाताडावर बसून काम करतोय. पप्पांचा (मधुकर ठाकूर) वारसा चालवणे गरजेचे आहे. त्यासाठी राजाभाऊ पुढे यायलाच हवेत. मी सत्तेत नसूनही सर्वसामान्यांना न्याय देतोय. कॉंग्रेसला रायगड जिल्हा परिषदेच्या सत्तेत महत्त्वाचे स्थान मिळेल. महाविकास आघाडी म्हणून आमचे योगदान मोठे असेल."

यावेळी राजाभाऊ ठाकूर म्हणाले, "वडिलांनी चोंढीनाक्यावर एकेकाळी वेटर म्हणून काम केले, परंतु धडपड आणि जिद्द सोडली नाही. ज्यावेळी ते आमदार झाले तेव्हा सर्वप्रथम गरिबांच्या उन्नतीसाठी हायस्कूल-महाविद्यालय सुरू केले. ते स्वतः अल्प शिक्षित होते, पण पंचक्रोशीत इंग्रजी माध्यमाची शाळा काढली. सध्या परिसरात पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. कारण लोकांचे हक्काचे पाणी धनदांडग्यांना दिले जात आहे. चुकीची माणसे सत्तेत असल्यामुळे सर्वसामान्य जनतेला जगणे अशक्य झालेय. त्यामुळे मी निश्चितपणे यातून मार्ग काढेन. फक्त संधी द्या."

तत्पूर्वी सातिर्जे येथे सूर्यास्तापूर्वी माजी आमदार दिवंगत मधुकर ठाकूर यांच्या स्मृतिस्थळावर जाऊन कॉंग्रेसचे प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत, मिलिंद पाडगावकर, श्रुती म्हात्रे यांनी अभिवादन केले.आवासमधून राजाभाऊ ठाकूर, नयनाताई शिरधनकर, अनिता शिंदे हे उमेदवार आहेत, त्यांना प्रचंड मताधिक्याने निवडून द्या, असे सर्वच मान्यवरांनी जनतेला आवाहन केले. यावेळी सुनील थळे, रवींद्र ठाकूर, शंकरराव पाटील, योगेश मगर, शंकर आप्पा पेडवी, उमेश ठाकूर, प्रवीण ठाकूर, संदीप गायकवाड, शंकर गुरव आदी महाविकास आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि बैलगाडी शर्यतीचे प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 21व्या राष्ट्रीय लेव्हल 2026 अबॅकस स्पर्धेमध्ये प्रियदर्शिनी इंग्लिश मीडियम स्कूलचा विद्यार्थी देशात प्रथम

**दैनिक युवक आधार**

**सणसर/विकास क्षत्रिय :** 21 व्या राष्ट्रीय लेवल स्पर्धेमध्ये प्रियदर्शिनी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजचा विद्यार्थी अरहान सुरज शेख ने एलिमेंट्री लेवल मध्ये पहिला क्रमांक प्राप्त केला.या स्पर्धेमध्ये भारतातून अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. पाँडीचेरी (तामिळनाडू ) येथे अरहान सुरज शेख याचा मेडल,ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला.



या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन पी.जी. नायर सर संस्थेचे व्हाईस चेअरमन इमरान शेख सर,प्राचार्य सुधीर भिसे सर,सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## राजगुरुनगरमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली; कार्यकर्त्यांशी असलेली नाळ व दूरदृष्टीच्या नेतृत्वाचा गौरव

**दैनिक युवक आधार**

**राजगुरुनगर प्रतिनिधी :** राजगुरुनगर वासियांच्या वतीने उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी काल एक भावपूर्ण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात अजितदादा पवार यांची कार्यकर्त्यांशी असलेली घट्ट नाळ, कार्यकर्त्यांची ताकद ओळखून त्यांना सोबत घेऊन वाटचाल करणारी नेतृत्वशैली तसेच दूरदृष्टी असलेला नेता म्हणून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित वक्त्यांनी अजितदादा पवार यांच्या राजकीय कारकिर्दीचा आढावा घेतला. त्यांच्या ठाम निर्णयक्षमता, विकासाभिमुख दृष्टीकोन आणि सामान्य कार्यकर्त्यांपर्यंत थेट पोहोचणारी नेतृत्वशैली यांचा विशेष उल्लेख करण्यात आला. राज्याच्या राजकारणात त्यांनी बजावलेली महत्त्वपूर्ण भूमिका आणि कार्यकर्त्यांवर ठेवलेला विश्वास यामुळेच त्यांनी जनतेच्या मनात अढळ स्थान निर्माण केले, असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.



या श्रद्धांजली कार्यक्रमाला आमदार बाबाजी काळे, माजी आमदार दिलीप मोहिते पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष अनिल बाबा राक्षे, भाजप प्रदेश कार्यकारिणी सदस्य किशोर अण्णा कुमठेकर, ज्येष्ठ नेते अॅड. मुकुंदराव आवटे, राष्ट्रवादी काँग्रेस खेड तालुका अध्यक्ष कैलास सांडभोर यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचा समारोप अजितदादा पवार यांच्या कार्याला अभिवादन करून व त्यांच्या आठवणींना उजाळा देत करण्यात आला. संपूर्ण परिसरात शोकाकुल वातावरण असतानाच त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन पुढील वाटचाल करण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

# कर्करोगाने पिडीत बालरुग्णांसाठी एकजुटीने उभे राहणे गरजेचे

## जागरूकता, वेळीच उपचार आणि रुग्णास पोषक अशा वातावरणाने उपचारात होतो फायदा - तज्ज्ञ

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** जागतिक कर्करोग दिनानिमित्त तज्ज्ञांनी बाल कर्करोगाबाबत अधिक जनजागृती, वेळेवर निदान आणि सर्वांना समान उपचार सुविधा मिळण्याची गरज अधोरेखित केली आहे. यंदाच्या 'युनायटेड बाय युनिक" (United by Unique)' या संकल्पनेवर भर देत प्रत्येक मुलाचा कर्करोगाशी लढण्याचा प्रवास वेगळा असला, तरी कुटुंबे, आरोग्यसेवा देणारे तज्ज्ञ आणि समाज यांनी एकत्र येऊन कोणतेही मूल उपचारांपासून वंचित राहू नये, याची खात्री करणे अत्यंत गरजेचे आहे असा सल्ला यावेळी देण्यात आला.



प्रौढांच्या कर्करोगाच्या तुलनेत दुर्मिळ असले तरी, बालकर्करोग भारतात दरवर्षी ० ते १९ वयोगटातील हजारो मुलांना आणि किशोरवयीन मुलांना प्रभावित करतात. बाल कर्करोगामध्ये ल्युकेमिया, ब्रेन ट्यूमर, लिम्फोमा, न्यूरोब्लास्टोमा आणि विल्म्स ट्यूमर यांचा समावेश होतो. हे कर्करोग अनेकदा पेशींच्या विकासादरम्यान होणाऱ्या अनुवांशिक बदलांमुळे आढळून येतात आणि ते सहसा टाळता येण्यासारखे नसतात.

कर्करोग असलेल्या प्रत्येक मुलाचा एक वेगळा प्रवास असतो, वेगवेगळी आव्हानं आणि वेगवेगळ्या गरजा असतात. बाल कर्करोगाच्या सुरुवातीच्या लक्षणांमध्ये सतत ताप येणे, न समजलेली जखम, थकवा, असामान्य गाठी, वारंवार संक्रमण किंवा वजनात वाढ न होणे यांचा समावेश असू शकतो. या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यास निदानाला विलंब होऊ शकतो आणि गुंतागुंत वाढू शकते, अशी प्रतिक्रिया डॉ. पूर्वी कडाकिया कुट्टी(बालरोग हिमेटो-ऑन्कोलॉजिस्ट आणि बोन मॅरो ट्रान्सप्लांट, न्यूईरा हॉस्पिटल्स, वाशी, नवी मुंबई) यांनी स्पष्ट केली. जगण्याची शक्यता आणि जीवनाची गुणवत्ता सुधारण्यासाठी वेळीच निदान करणे गरजेचे आहे.

डॉ. पूर्वी कडाकिया कुट्टी पुढे सांगतात की, जागतिक कर्करोग दिनानिमित्त बाल कर्करोग हा जीवघेणा असला तरी, वेळीच निदान आणि उपचारांनी त्यावर मात करता येते आणि तो पूर्णपणे बरा होऊ शकतो.वैद्यकीय उपचारांमधील प्रगतीमुळे यामध्ये शस्त्रक्रिया, केमोथेरपी, रेडिएशन थेरपी आणि CAR-T सेल थेरपीसारख्या नवीन इम्युनोथेरपीचा समावेश आहे. अनेक मुलांसाठी उपचारांचे परिणाम लक्षणीयरीत्या सुधारले आहेत. शारीरिक आजारांव्यतिरिक्त, बाल कर्करोग हा मुलांच्या भावनिक आरोग्यावर, त्यांच्या शिक्षणावर आणि सामाजिक विकासावर खोलवर परिणाम करू शकतो. बालरुग्णांच्या कुटुंबियांना भीती, चिंता आणि आर्थिक तणावाचा सामना करावा लागू शकतो, ज्यामुळे वैद्यकीय, सामाजिक-मानसिक गरजा पूर्ण करणाऱ्या सहाय्यक प्रणालीची आवश्यकता अधोरेखित होते. बाल कर्करोग गंभीर असला तरी, पालकांनी हे जाणून घेणे आवश्यक आहे की तो संसर्गजन्य नाही आणि बहुतेक प्रकरणांमध्ये अनुवांशिक परिस्थिती ऐवजी जनुकीय बदलांमुळे हा आजार उद्भवतो.

डॉ. पूर्वी कडाकिया कुट्टी पुढे सांगतात की, जागरूकता, वेळीच उपचार आणि रुग्णास पोषक अशा योग्य वातावरणाने उपचारात नक्कीच फायदा होतो. जरी प्रत्येक मुलाचा कर्करोगाचा प्रवास वेगळा असला तरी, प्रत्येक मुलाला जगण्याची आशा, उपचारादरम्यान योग्य काळजी आणि जगण्याची नवी संधी देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. 'युनायटेड बाय युनिक' म्हणजे, एकत्र उभे राहत प्रत्येक व्यक्तीचे वेगळेपण ओळखणे. समाजात करिकरोगाविषयी जागरूकता पसरवून, वेळीच निदानाचे महत्त्व पटवून देत त्यानुसार उपचार उपलब्धता करुन देणे गरजेचे आहे.

# श्री बाळासाहेब सोपान गावडे आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित



**दैनिक युवक आधार**

**गेवराई प्रतिनिधी भीमराव गावडे:** महाराष्ट्र पत्रकार संघ यांच्यावतीने मूकनायक व दर्पण दिनानिमित यावर्षीचा आदर्श शिक्षक पुरस्काराने श्री बाळासाहेब सोपान गावडे याना विविध मान्यवरांच्या उपस्थितीत प्रधान करण्यात आला.मादळमोही येथील रहीवासी पालघर जिल्हयात आती ग्रामीन भागात 11 वर्ष सेवा करून गेवराई तालुक्यातील मुळुकवाडी येथे गेल्या आठ वर्षा पासुन शिक्षक सेवा सुरू आहे. शंभर टक्के पटनोदंनीत सहभाग अध्यापनात स्वनिर्मीत शैक्षणीक साहित्याचा वापर शाळेत वेगवेगळे उपक्रम राबवुन विद्याथर्याच्या गुणवत्ते वाढ करण्याचा प्रयत्न ऐतिहासीक स्थाळाना भेटी देने. शाळा विकासासाठी गावक-यांचा सहभाग केद्रस्तरिय व राज्यस्तरिय स्पर्धेचे आयोजन, सामाजीक कार्यात आग्रेसर राहुन काम करीत आहेत.

कोल्हापुरला पुरपरिस्थिती निर्माण झाली तेव्हा मादळमोही कराकडुन मदत गोळा करून स्वता कोल्हापुरला जाऊन मदत केली. अंध अपंगाना लोकसहभागातुन मदत मिळवुन देत आहे. संघर्षधान्य बॅकच्या माध्यामातुन गेल्या पाच वर्षापासुन आहे.गरजुवंताना धान्य व किराना वाटपात सहभाग स्वता कुटुंबातील सदस्याचा वाढदिवसाचा खर्च न करिता आश्रमात किंवा वृधदाश्रमात किराना किंवा जेवन देऊन साजरा केला जातो.

जुनी पेन्शन कर्मचारी संघटना जिल्हा सरचिटणीस म्हणुन तीन वर्ष काम केले. जुनी पेन्शन मिळवण्यासाठी लढ्यात सहभाग आनेक मोर्चात सहभाग प्रहार शिक्षक व शिक्षकेतर सघटना गेवराई तालुका अध्यक्ष म्हणुन काम करित आहे आनेकांचे प्रश्न याच्या माध्यामातुन सोडविण्याचा प्रामणीक पणे प्रयत्न करित आहे.यावेळी परिवारातील सदस्य ,पत्नी जयश्री गावडे,श्री किरण भैया गावडे, श्री केशव भैय्या गावडे ,श्री उमेश चौरे ,श्री सुरेश भोपळे व इतर मान्यवर उपस्थित होते.पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व मित्र परिवार ,गावकरी आनंद व्यक्त करत आहेत.

# वांझोळे येथील शिवाजी माध्यमिक विद्यालयाच्या १९९५-९६ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा गेट टु गेदर कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**संगमेश्वर (प्रमोद तरळ) :** तालुक्यातील शिवाजी माध्यमिक विद्यालय, वांझोळे येथील १९९५–१९९६ या एस.एस.सी. बॅचचे माजी विद्यार्थी यांचा गेट-टू-गेदर कार्यक्रम सर्व विद्यार्थ्यांच्या वतीने रविवार दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी हाबीबी फार्महाऊस, शहाड येथे उत्साहात पार पडला.



सकाळी ९ वाजता स्वागताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. त्यानंतर नाश्ता, बॅनर अनावरण व राष्ट्रगीत सादर करण्यात आले. दिवंगत शिक्षक व माजी विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. उपस्थित सर्व सदस्यांची ओळख सत्रात ओळख करून देण्यात आली.

यानंतर स्विमिंग पूल मस्ती व विविध मनोरंजनात्मक उपक्रम घेण्यात आले. दुपारी स्नेहभोजनानंतर सभा व चर्चा सत्र पार पडले. या सत्रात शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत भावी उपक्रमांबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली.

चर्चा सत्राच्या शेवटी शेवटी काही विद्यार्थी इमोशनल झाले आणि बोलता बोलता त्यांच्या डोळ्यातून अश्रूधारा, (गंगा जमुना) वाहू लागल्या कारण १९९६ ते २०२६ च्या त्या ३० वर्षांच्या आठवणींना उजाळा देणारा तो प्रवास होता. सायंकाळी विविध खेळ व नृत्य कार्यक्रम पार पडले. कार्यक्रमाच्या शेवटी रायगड स्वाभिमानच्या वतीने अंकुश गुरव हे त्याच विद्यालयाचे विद्यार्थी आहेत यांनी उपस्थित सर्व मान्यवर व सदस्यांचे आभार मानण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश पंदेरे. संदीप ढवळ आणि अंकुश गुरव यांनी खूप खेळीमेळीत पार पाडले चहापानानंतर एकमेकांची गळाभेट घेऊन निरोप देण्यात आला. हा गेट-टू-गेदर कार्यक्रम सर्वांसाठी आनंददायी व संस्मरणीय ठरला.

# सामाजिक व शैक्षणिक योगदानाची दखल : राहुल दवते यांना हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर

**दैनिक युवक आधार**

**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी :** महाराष्ट्र शिक्षण संस्था संचलित पालखेड येथील न्यू इंग्लिश स्कूल, ता. निफाड येथील उपक्रमशील शिक्षक राहुल रामदास दवते यांना सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्मृतीपित्यर्थ गुणवंत शिक्षक पुरस्कार–२०२६ जाहीर झाला आहे.

हा पुरस्कार सामाजिक बांधिलकी, शिक्षणातील नावीन्यपूर्ण उपक्रम आणि समाजहितासाठी केलेल्या कार्याची दखल म्हणून देण्यात येतो. सदर पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दलचे अधिकृत निवडीपत्र भगूर नगरपालिकेचे माजी नगरसेवक संग्राम करंजकर यांच्या स्वाक्षरीने श्री. दवते यांना नुकतेच प्राप्त झाले आहे.



राहुल दवते यांनी अध्यापन क्षेत्रात विद्यार्थीकेंद्री उपक्रम, वाचन-विकासासाठीचे प्रयत्न आणि शैक्षणिक नवकल्पना राबवत सातत्याने उल्लेखनीय कार्य केले आहे. शिक्षणाबरोबरच सामाजिक क्षेत्रातही ते सक्रिय असून, निफाडची वाचन संस्कृती जपणाऱ्या १०६ वर्षे जुने श्री माणकेश्वर वाचनालयात ते सहचिटणीस म्हणून जबाबदारी पार पाडत आहेत. तसेच निफाड तालुका माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहकारी पतसंस्थेत कार्यवाह पदावर काम करताना त्यांनी संस्थात्मक कामकाजात शिस्त व पारदर्शकता जपली आहे.

पत्रकारितेच्या माध्यमातून प्रलंबित प्रश्न, स्थानिक समस्या आणि नागरिकांच्या अडचणींना वाचा फोडण्याचे कार्यही त्यांनी सातत्याने केले आहे. शिक्षण, वाचनसंस्कृती, सहकार आणि सामाजिक प्रश्नांवरील संवेदनशील भूमिका यांमुळे त्यांनी समाजात आगळावेगळा ठसा उमटवला आहे.

या निवडीबद्दल शिक्षण क्षेत्रातील सहकारी, सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी-पालक तसेच विविध स्तरांतून राहुल दवते यांचे अभिनंदन होत असून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.

# साई कृपा सोसायटीत प्रजासत्ताक दिनाचा सामाजिक संदेश देणारा उत्सव

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी :** कोपर खैरने सेक्टर ०९ येथील साई कृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित येथे प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात आणि सामाजिक जाणीवेने साजरा करण्यात आला.

या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे सोसायटीचे अध्यक्ष श्री. निलेश शशिकांत चौधरी, सेक्रेटरी श्री. कुणाल कृष्णा मसणे, खजिनदार श्री. महेंद्र केशव पडवणकर तसेच संपूर्ण कार्यकारिणी व सभासदांनी एकमताने घेतलेला निर्णय.

यंदाचा ध्वजारोहणाचा मान हा नवी मुंबई महानगरपालिकेतील मालिनिसारण विभागात कार्यरत कर्मचारी श्री. रवी वीरेन व सोसायटीतील सफाई कर्मचारी श्री.प्रवीण कुमार यांना देण्यात आला. समाजातील प्रत्येक घटकाचा सन्मान व्हावा या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.



ध्वजारोहणानंतर लहान मुले व महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून मुलांमध्ये देशभक्तीची भावना अधिक दृढ झाली.

साई कृपा सोसायटीचा हा उपक्रम सामाजिक समतेचा आणि श्रमाचा सन्मान करणारा आदर्श ठरत असून इतर सोसायट्यांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

# घाटंजी तालुक्यात पारवा जि. प. कन्या शाळेत स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी महेश पेन्दोर/घाटंजी :** तालुक्यातील पारवा जिल्हा परिषद प्राथमिक मराठी कन्या शाळेत दिनांक २ फेब्रुवारी सोमवारला स्नेहसंमेलन आयोजन करून यात विविध सांस्कृतिक कलाविष्काराने मोठ्या उत्साहात विध्यार्थिनींनी साजरा केला.

दैनंदिन अभ्यासाबरोबरच विध्यार्थिनींच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका गीता मानकर यांनी शाळेत स्नेहसंमेलन आयोजित केले होते. या संमेलनात प्रमुख पाहुण्यांना शाळेच्या मुख्यद्वारा पासून विध्यार्थिनींनी स्वागत करीत मंचकावर आणले.



उपस्थित मान्यवरांनी दीप प्रज्वलन करून क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केले. यावेळी महिला मेळाव्यातील उत्कृष्ट प्रदर्शन करणाऱ्या महिलांना व बाल आनंद मेळाव्यात कमी गुंतवणिकीत जास्त खरी कमाई करणाऱ्या व क्रीडा क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या विध्यार्थिनींना प्रोत्साहनपर अनुनाक्रमे पारितोषिक मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष हेमंत ठाकरे हे होते तर उदघाटक म्हणून पारवा पोलीस स्टेशनचे ठाणेदार हेमंत चौधरी हे लाभले होते. प्रमुख अतिथी म्हणून ग्रामपंचायत सदस्य बालाजी पोटपिल्लेवार, राजू दवणे, शा. व्य. समितीच्या उपाध्यक्ष उषाताई चौधरी, पारवा केंद्राच्या केंद्रप्रमुख मिनाताई धोटे, प्रमोद दोडावार,सेवानिवृत्त शिक्षक अशोक जिल्डवार घाटंजी तालुका मराठी पत्रकार बहु. संस्थेचे उपाध्यक्ष तथा लोकमत प्रतिनिधी दिनेश गाऊत्रे, संदीप जयस्वाल,अमोल उदार,लिटिल चॅम्प इंग्लिश मिडीयम स्कुलच्या मुख्याध्यापिका अर्चना आरेवार शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य मंचकावर उपस्थित होते. यावेळी शाळेच्या विध्यार्थिनींनी विविध मराठी व हिंदी गाण्यावर आधारित नृत्य सादर करून उपस्थित मान्यवर, पालक व प्रेक्षकांची मने जिंकली. चिमुकल्यांसाठी पालकांनीही खिसा रिकामा करत हजारो रुपये खाऊसाठी बक्षीस दिले. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन सहाय्यक शिक्षक प्रशांत भेदूरकर यांनी केले तर आभार मुख्याध्यापिका गीता मानकर यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गिरीष सुकंडवार व मातापालकांचे विशेष सहकार्य लाभले.

# शेटफळगढे गणात श्री.सौरभ झगडे यांच्या नावाची जोरदार चर्चा; सर्वेक्षणात सौरभ झगडे यांचा विजयासाठी चढता आलेख

**दैनिक युवक आधार**

**सणसर :- विकास क्षत्रिय :'** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे बिगुल वाजलेले असताना प्रस्थापितांनी आपापले मोर्चेबांधणी सुरू केली आहे यामध्ये इंदापूर तालुक्यातील शेटफळगढे गणामध्ये एक वेगळीच लढत पाहायला यावेळी मिळत आहे या शेटफळगढे गणामध्ये नवीन चेहऱ्यांना पसंती येत आहे कारण या गटामध्ये मा.सौरभ गणेशकुमार झगडे यांचे नाव सध्या लोकांच्या वळणी पडलेले असून या नावाला वाढता प्रतिसाद मिळत आहे.या निवडणुकीमध्ये पंचायत समितीसाठी सौरभ झगडे हे पंचायत समितीसाठी किटली या चिन्हावर लढवत



असून ते माजी उपमुख्यमंत्री स्व.अजितदादा पवार यांचे विश्वासू कार्यकर्ते असून सौरभ झगडे यांचे नाव सामाजिक कार्यात नेहमीच पुढे असते व ते नेहमीच समाजकार्यात अग्रेसर असतात

मा.सौरभ झगडे यांची समाजकारणाची पद्धत वेगळी असून कोणतीही स्वार्थी पार्श्वभूमी नसून केवळ समाजकार्य व गरीब शोषितांच्या अडीअडचणींना उपयोगी पडणे त्याचबरोबर आपल्या कंपनीमध्ये त्यांनी अनेक गरजू युवकांना रोजगार मिळवून दिला आहे कमी वयात आपली कंपनी उभा करून चांगल्या पद्धतीने व्यवसाय करीत असल्यामुळे युवा वर्गाचा त्यांना चांगला पाठिंबा आहे इंदापूर तालुक्याच्या पश्चिम भागात त्यांच्याकडे एक यशस्वी उद्योजक म्हणून पाहिले जाते.शेटफळगढे गणात त्यांच्या मतदारांशी संपर्क साधून पंचायत समिती निवडणूक लढवत असल्याबद्दल ते मतदारांची चर्चा करत आहेत यामध्ये त्यांना मतदारांमधून चांगला प्रतिसाद मिळत आहे.

# नरनाळा महोत्सव आता १५ ते १७ फेब्रुवारीदरम्यान

**दैनिक युवक आधार**

**अकोट(अकोला) :** नरनाळा महोत्सवासाठी आता दि. १५ ते १७ फेब्रुवारी या तारखा निश्चित करण्यात आल्या असून, जंगल सफारी, साहसी खेळ व विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या समावेशासह महोत्सव घेण्यात येईल, असे जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज येथे सांगितले.




महोत्सवातून सातपुड्यात वसलेल्या मेळघाटचे वनवैभव, आदिम संस्कृतीचे दर्शन घडणार आहे. उत्सवात नौकाविहार, सफारी, आदिवासी नृत्यकला सादरीकरण, पक्षीनिरीक्षण, गड भटकंती, साहसी खेळ, छायाचित्र प्रदर्शन याबरोबरच अनेकविध सांस्कृतिक महोत्सवांचे आयोजन केले जाणार आहे. महोत्सवात प्रत्येक दिवशी सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. 'चला हवा येऊ द्या', 'शिवशंभू गर्जना', तसेच प्रसिद्ध गायक कैलास खेर यांची 'लाईव्ह कॉन्सर्ट' असे नामवंत कलावंतांचा समावेश असलेले कार्यक्रम महोत्सवाचे खास आकर्षण ठरणार आहे.

त्याचप्रमाणे, निसर्ग निर्वाचन संकुल, शहानुर येथे जंगल सफारी, ट्रेकिंग, व्हॅली क्रॉसिंग,रॅपलिंग, बोटिंग व झॉर्बिंग वॉटर बॉलचे आयोजन पोपटखेड धरण येथे करण्याचे नियोजन आहे. सर्व संबंधित यंत्रणांनी आवश्यक पूर्वतयारी करावी. विविध माध्यमांद्वारे माहिती सर्वदूर पोहोचवावी. ऐतिहासिक वैभव व वनसमृद्धी लाभलेला नरनाळा किल्ला अकोला जिल्ह्याचे भूषण असून, जिल्ह्यातील नागरिकांनी अधिकाधिक संख्येने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे.

## श्री सेवा प्रतिष्ठानच्या पुढाकाराने गालसुरे विद्यामंदिरात विद्यार्थी गुणगौरव सोहळा उत्साहात



**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी-अनिकेत मोहित :** श्री सेवा प्रतिष्ठान, श्रीवर्धन–मुंबई यांच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासून गालसुरे विद्यामंदिर, गालसुरे येथील विद्यार्थ्यांसाठी वह्यावाटप तसेच दहावी, बारावी, कृषी व पदवीधर विद्यार्थ्यांचा सत्कार सातत्याने करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत यंदाही विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा गौरव करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ विचारवंत नेते व लेखक, मा. श्री. माधवजी भंडारी यांच्या श्रीवर्धन दौऱ्याच्या निमित्ताने दिनांक २ फेब्रुवारी रोजी गालसुरे विद्यामंदिर, गालसुरे येथे विद्यार्थी गुणगौरव सोहळा पार पडला. हा कार्यक्रम सामाजिक व भाजपाचे कार्यकर्ते श्री. अजय पोलेकर यांनी मा. श्री. माधवजी भंडारी साहेबांच्या शुभहस्ते आयोजित केला.या प्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मा. श्री. माधवजी भंडारी यांनी शिक्षणाचे महत्त्व, सामाजिक भान व मूल्याधिष्ठित जीवन यावर प्रकाश टाकत विद्यार्थ्यांना उज्ज्वल भवितव्यासाठी प्रेरणा दिली. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करताना उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या यशाबद्दल कौतुक केले.कार्यक्रमाला गालसुरे विद्यामंदिराच्या मुख्याध्यापिका सौ. जामकर मॅडम, श्री. चंद्रकांत कनगुटकर, श्रीवर्धन वाचनालयाचे श्री. मनोज गोगटे, श्री. परेश पोलेकर, अनुलोमचे जिल्हा प्रमुख श्री. राहुल तलकर, श्री. अमित गोखले, तसेच सर्व शिक्षकवर्ग व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री सेवा प्रतिष्ठानच्या या सामाजिक उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळत असून, अशा उपक्रमांमुळे समाजात शिक्षणाविषयी सकारात्मक वातावरण निर्माण होत असल्याचे उपस्थितांनी नमूद केले.

# नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे कारागृह अधिकारी व कर्मचारी यांचे विभागीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर :** नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे दिनांक 03/02/2026 ते 05/02/2026 या कालावधीत पूर्व विभागातील कारागृह अधिकारी/कर्मचारी यांच्या विभागीय क्रिडास्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. सदर क्रीडास्पर्धेचे उद्घाटन मा. डॉ. रविंद्र कुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर यांचे हस्ते आज दिनांक 03/02/2026 रोजी सायंकाळी 4.30 वाजता नागपूर मध्यवर्ती कारागृह कवायत मैदान येथे संपन्न झाले. सदर क्रिडास्पर्धेमध्ये नागपूर, अमरावती, अकोला, चंद्रपूर, वर्धा, भंडारा,यवतमाळ, बुलढाणा, वाशिम,मोर्शी व गडचिरोली येथील 11 कारागृहातील 226 अधिकारी व कर्मचारी खेळाडु सहभागी झाले आहेत.



क्रिडास्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी पोलीस बँड पथकाचे तालावर पूर्व विभागातील 11 कारागृहातील खेळाडुंनी एक ताल, एक लय, एक सुर व उत्तम शिस्त अशा दर्जेदार लयबध्दतीचा समन्वय याचे सुदंर प्रात्यक्षिक संचलन करुन मा. प्रमुख पाहुण्यांना मानवंदना दिली. तसेच मागील वर्षिच्या विभागीय क्रिडास्पर्धेमध्ये तसेच राज्यस्तरीय क्रिडा प्रकारामध्ये प्राविण्य प्राप्त उत्कृष्ठ खेळाडुंनी क्रिडाज्योतीचे आगमन करुन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रज्वलन केले. सदर क्रिडास्पर्धा उद्घाटन कार्यक्रमाच्या सुरवातीस श्रीमती किर्ती चिंतामणी, अधीक्षक अमरावती मध्यवर्ती कारागृह यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाचुन दाखविले.

सदर क्रिडास्पर्धेमधील खेळाडुंना प्रमुख पाहुणे व उद्घाटक मा. डॉ. रविंद्र कुमार सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर यांनी प्रत्येक व्यक्तिंनी कोणतातरी एक खेळ खेळावा, त्यामुळे आपले शारीरीक व मानसिक आरोग्य उत्तम राहते, शरीर हीच आपली मोलाची संपत्ती आहे व शरीर हेच आपले घर आहे, कारागृह विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची डयुटी अत्यंत ताण-तणावाची आहे, त्यामुळे प्रत्येकाने शरीर व मानाचा ताण कमी करण्याकरीता कोणतातरी एक खेळ खेळावा, खेळाला वयाचे बंधन नसते असे मोलाचे मार्गदर्शन केले. मा. डॉ. रविंद्र कुमार सिंगल हे स्वत: एक उत्कृष्ठ खेळाडु असुन त्यांनी त्यांच्या तंदुरुस्तीमुळे आयर्नमॅन ट्रायथलॉन अशी खडतर व कठीण स्पर्धा जिंकुण भारताला गौरव मिळवून दिला आहे. सदर कार्यक्रम प्रसंगी श्रीमती दिपा आगे, अतिरीक्त अधीक्षक, नागपूर मध्यवर्ती कारागृह यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. तसेच क्रिडास्पर्धेच्या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मा. श्री. वैभव सु. आगे, कारागृह उपमहानिरीक्षक, पूर्व विभाग, नागपूर तथा अधीक्षक नागपूर मध्यवर्ती कारागृह यांनी केले. सदर उद्घाटन समारंभात नागपूर मध्यवर्ती कारागृहातील महिला कर्मचारी यांनी स्वागत नृत्य सादर करुन प्रमुख पाहुणे व उपस्थितांचे मन हर्षित केले.

क्रिडास्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी पूर्व विभागातील 11 कारागृहांचे कारागृह अधीक्षक, नागपूर मध्यवर्ती कारागृहातील अधिकारी व कर्मचारी व मोठया संख्येने प्रेक्षक वर्ग उपस्थित होते.सदर तिन दिवसीय क्रिडास्पर्धेमध्ये कबड्डी, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, रस्सीखेच, धावणे, थाळीफेक, भालाफेक, गोळाफेक, लांबउडी, बॅटमिंटन, कराटे, कुस्ती इत्यादी खेळांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच उत्कृष्ठ प्रदर्शन करणाऱ्या खेळाडुंची पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय क्रिडास्पर्धेकरीता निवड करण्यात येणार आहे.

# पनवेल तालुक्यात शेकापला मोठा धक्का; चार गावातील शेकाप कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये जाहीर प्रवेश

**दैनिक युवक आधार**

**पनवेल( प्रतिनिधी) :** निवडणुका जवळ आल्या की भूलथापा देऊन कार्यकर्ते व मतदारांची दिशाभूल करणाऱ्या शेतकरी कामगार पक्षाला जनता पूर्णपणे कंटाळली आहे. त्याचा प्रत्यय प्रत्येक निवडणुकीत नागरिकांना येत असून, परिणामी शेकापला सातत्याने गळती लागलेली दिसून येत आहे. याच पार्श्वभूमीवर पनवेल तालुक्यातील बेलवली, दुंदरे, धोदानी आणि धामणी या चार गावांमधील शेकापच्या कार्यकर्त्यांनी आज (दि. ०४) भारतीय जनता पार्टीत जाहीर पक्षप्रवेश केल्याने शेकापला आणखी एक मोठा हादरा बसला आहे.

हा पक्षप्रवेश सोहळा पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ



भगत, पनवेल महानगरपालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश झाला. याप्रसंगी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश कडू, तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, महाराष्ट्र प्रदेश वाहतूक संघटनेचे अध्यक्ष प्रभुदास भोईर, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, युवा नेते अतुल घरत, मालडुंगे ग्रामपंचायतीचे सरपंच सीताराम चौधरी, दुंदरे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच रमेश पाटील, राजेश भोईर, योगेश लहाने यांच्यासह भाजपचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

भाजपमध्ये प्रवेश करणाऱ्यांमध्ये बेलवली येथील राजेश बाळाराम पाटील, किशोर लडकू पवार, लक्ष्मण बाळाराम पाटील, दुंदरे येथील गजानन बबन उसाटकर, रवींद्र हिरु चौधरी, विभाग अध्यक्ष सुरेश बबन उसाटकर, एकनाथ कमलाकर चौधरी, गौरव एकनाथ चौधरी, धोदानी येथील माजी ग्रामपंचायत सदस्य राम नागो चौधरी, प्रशांत राघो घुटे, कमळ्या जानू घुटे, सोनी राम चौधरी, शानू बाबूराव चौधरी, परशुराम निरगुडा तसेच धामणी गावातील गोमा खंडवी, सुरेश खंडवी, किसन खंडवी, मनोहर भस्मा, नितेश भस्मा यांचा समावेश आहे. या सर्वांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नवप्रवेशित कार्यकर्त्यांचे स्वागत करण्यात आले. भाजपचे विकासाभिमुख धोरण, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात तर राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेली विकासाची वाटचाल तसेच लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुक्यात झालेला सर्वांगीण विकास पाहून शेकापमधील कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतल्याची भावना माजी सरपंच रमेश पाटील यांनी व्यक्त केली. भाजप अधिक बळकट करण्यासाठी व पनवेल तालुक्याच्या विकासासाठी सर्व कार्यकर्ते एकजुटीने काम करतील, असा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला.

## कु. सान्वी संजय नरवाडे वर्ल्ड बिगेस्ट ऑलिम्पियाड परीक्षा मध्ये प्रथम

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी नांदेड योगेश चौदंते :** आंध्र संमती इंग्लिश प्रीमियर स्कूल अंतर्गत घेण्यात येणार वर्ल्ड बिगेस्ट ऑलिम्पियाड परीक्षा मध्ये कु. सान्वी संजय नरवाडे ही वर्ग प्रथम .तिने वर्ल्ड बिगेस्ट ऑलिम्पियाड या परीक्षा मध्ये प्रथम रँक मध्ये येऊन तिला इंटरनॅशनल अवॉर्ड प्रथम बक्षीस एक हजार रुपये , तसेच इंटरनॅशनल ब्राँझ मेडल, सर्टिफिकेट आणि गोल्ड मेडल ऑफ डिस्टिंक्शन, सर्टिफिकेट , आउटस्टँडिंग परफॉर्मन्स मिळाले आहे . तिची या यशाबद्दल अभिनंदन केले जात आहे . तिला शुभेच्छा चा वर्षाव केले जात आहे, यावेळी आंध्र संमती इंग्लिश प्रीमियर स्कूल च्या मुख्याध्यापिका सौ.सुनीता मिस, सौ खुशी मिस, सौ स्वाती वाडेकर मिस, सौ.मोनिका शेट्टी मिस, सौ दिपाली स्वामी मिस, क्लास टीचर सौ.माधुरी मिस, सौ मोहिनी विष्णुपुरी मिस, सौ सारिका नरवाडे मिस या सर्वांनी सान्वीला शुभेच्छा दिल्या आणि प्रा. सदानंद पुंडगे, प्रा प्रल्हाद नरवाडे, प्रा. राजू नरवाडे, सहायक शिक्षका ज्योती नरवाडे प्रा. राजेश्री नरवाडे , प्रा सौरभ पुंडगे आदीनी



शुभेच्छा दिल्या. श्री गुरुगोविंदसिंगजी पत्रकारिता महाविद्यालय चे प्रा. संजय नरवाडे याची सुकन्या आहेत.

## इंद्रराज महाविद्यालयात कवितांचा जागर; मराठी संवर्धन पंधरवड्यानिमित्त काव्यमैफल

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** शहरातील इंद्रराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने ‘मराठी भाषा संवर्धन पंधरवडा’ उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या खुल्या कविसंमेलनाने महाविद्यालयाचे वातावरण काव्यमय झाले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर जी.जी. राजपूत होते. प्रमुख उपस्थितीमध्ये विद्यापीठ व्यवस्थापन समितीचे सदस्य तथा उपप्राचार्य प्रोफेसर व्ही.बी. लांब यांची उपस्थिती होती. पंधरवड्यानिमित्त महाविद्यालयात निबंध, कथालेखन, सुंदर हस्ताक्षर आणि वक्तृत्व अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाचा समारोप कविसंमेलनाने करण्यात आला.

या कविसंमेलनात श्रुती वरपे, प्रवीण काकडे, राजनंदिनी वेलदोडे, पुष्पांजली वेलदोडे, ऋषिकेश गायकवाड आणि शेख फरहान या विद्यार्थ्यांनी आपल्या रचना सादर करून रसिकांची दाद मिळवली.विद्यार्थ्यांसोबतच प्राध्यापकांनीही आपल्या काव्यप्रतिभेने कार्यक्रमात रंगत आणली.




यात डॉ. मनीषा मुगळीकर, प्रो. सविता म्हस्के, डॉ. सुचिता देशमुख, श्रीमती कलात्रे, डॉ. रूपाली बिरादार, डॉ. कृष्णा नगरे, प्रो. बी.एन. कावळे, प्रो. जे.एस. अंभोरे, प्रो. रमेश मेंढे, प्रो. अनिरुद्ध मोरे आणि डॉ. मधले यांनी आपल्या विविध विषयांवरील कविता सादर केल्या. प्राचार्य प्रोफेसर जी.जी. राजपूत यांच्या ‘पोस्टर है हम’ या कवितेने श्रोत्यांचे विशेष लक्ष वेधून घेतले.

अध्यक्षीय समारोपामध्ये प्राचार्य राजपूत यांनी कवितेची सर्वव्यापकता व मानवी जीवनातील तिचे महत्त्व उलगडून दाखविले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी विभाग प्रमुख तथा संयोजक प्रोफेसर अनिरुद्ध मोरे यांनी केले, तर आभार उपप्राचार्य प्रोफेसर व्ही.बी. लांब यांनी मानले. या कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ठाण्यात रंगला इमेज इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्डचा कौतुक सोहळा

## डॉ.प्रभाकर कांबळे यांना इमेज इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड अवार्ड ने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**ठाणे/ प्रतिनिधी :** विक्रोळी टागोर नगर येथील वनिता फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष व विशेष कार्यकारी अधिकारी, राज्य गुणवंत कामगार असोसिएशनचे मुंबई जिल्हाध्यक्ष गुणवंत कामगार डॉ. प्रभाकर तुकाराम कांबळे यांना सन २०२६ चा " इंटरनॅशनल इमेज बुक ऑफ रेकॉर्ड अवॉर्ड " चित्रपट अभिनेता दीपक जोशी यांच्या हस्ते सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व शाल देऊन सन्मानित करण्यात आले असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समृद्धी प्रकाशन चे प्रा. डॉ.बी एन खरात होते.

इमेज इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्डस, एशियन युथ इमेज कॉन्फरन्स अँड अवॉर्ड शिरोमणी यांच्या संयुक्त विद्यमाने विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा ठाण्यातील मराठी ग्रंथ संग्रहालय पहिला मजला रेगे सभागृहात रंगला कौतुक सन्मान रेकॉर्ड सोहळा संपन्न झाला असून या सोहळया चे यजमान पद माझ्या नवऱ्याची बायको व होणार सून मी या घरची ,तुझी माझी जमली जोडी या मालिकेतील अभिनेते दिपक जोशी त्याचबरोबर ज्येष्ठ समाजसेविका मानसी परब राणे ,नागरी संरक्षण दलाचे विजय जाधव ,ज्येष्ठ साहित्यिक डॉ.भूपेंद्र संखे, ज्येष्ठ समाजसेवक भरत खांडेकर गुणवंत कामगार डॉ.पी.टी. कांबळे , सहकार तज्ञ डॉ. आर. एस .जाधव आदी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये गुणवंत कामगार केरबा डावरे , बाळकृष्ण तावडे यांना महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार, सीए के आर.बिद, यांना प्राईड ऑफ हिंदुस्तान अवार्ड डॉ.




राजेंद्र जाधव यांना भारत प्रतिभा सन्मान पुरस्कार, गुणवंत कामगार तानाजी निकम ,नागोराव शिकारे ,सहकार तज्ञ दिपक शिंगरे यांना महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार ,चंद्रकांत मोरे यांना द ग्रेट कोकण रत्न अवॉर्ड राजू सोनकांबळे यांना महाराष्ट्र रत्न पुरस्कार , वैशाली कांबळे यांना भारत प्रतिभा सन्मान पुरस्कार सुनील मोहिते यांना द ग्रेट कोकण रत्न अवॉर्ड, शिवराम सांगळे यांना महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार अष्टपैलू कलाकार राजेंद्र सावंत भारत प्रतिभा सन्मान पुरस्कार ,राष्ट्रपती पुरस्कार विजेते तुकाराम पाटील यांना महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार प्रशांतकुमार शेवरेगार यांना प्राइड ऑफ हिंदुस्तान अवार्ड ,डॉ.संतोष कांबळे व दिलीप शिरसाट , अनिल कुमार हरकुळकर , रमेश नाईक यांना महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले असून सर्वांचे विविध स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे.

या कौतुक सोहळयाची सुरुवात द्वीप प्रज्वलनाने करण्यात आली असून प्रास्ताविक डॉ.बी एन खरात यांनी केल्यानंतर प्रमुख मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. चित्रपट अभिनेते दिपक जोशी, उपनियंत्रक विजय जाधव, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. भूपेंद्र सखे आदी मान्यवरांनी सर्वांना मार्गदर्शन केले.

# कॉंग्रेसचे लिंबा सर्कलमधील उमेदवार दत्तात्रय मायंदळे यांचा कॉर्नर सभांवर जोर, कॉर्नर बैठकीला मतदारांचा प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे :** पाथरी/ तालुक्यातील लिंबा जिल्हा परिषद सर्कलचे कॉंग्रेसचे उमेदवार तथा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक दत्तात्रय मायंदळे यांनी सोमवारी सायंकाळी मतदारांच्या गाठी भेटी घेऊन थेट मतदारांशी संवाद साधला दि २ फेब्रुवारी रोजी सायंकाळी मुदगल येथे मतदारांशी



कॉर्नर बैठक घेऊन संवाद साधत असताना लिंबा जिल्हा परिषद गटात मागील अनेक वर्षांपासूनचा कामाचा लेखाजोखा मांडला यावेळी पंचायत समिती गणाचे उमेदवार बबन पवार यावेळी उपस्थित होते दत्तात्रय मायंदळे हे आपल्या समर्थक कार्यकर्त्यांसह नागरिकांच्या भेटीगाठी घेऊन भविष्यात आपण या लिंबा जिल्हा परिषद सर्कलमध्ये काय काय कामे करणार आहोत याचा आराखडा मांडत आहेत तसेच येणाऱ्या काळात आपण या लिंबा सर्कलसाठी दिवसरात्र काम करून गावागावांतील विकास कामे करण्यावर भर देणार असल्याचे सांगत आहेत नागरिकांची जिल्हा परिषद पंचायत समितीची विविध कामे करण्यावर भर देणार असल्याचे त्यांनी मतदारांशी संवाद सांगताना सांगितले मतदारांशी संवाद साधून त्यांच्या अडिअडचणी जाणून घेवून त्या सोडविण्याचे आश्वासन दिले या कॉर्नर बैठकीला मुदगल येथील नागरिकांना चांगला प्रतिसाद दिला

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## गोळेगावच्या तारादेवी यात्रेत आजी-माजी सैनिकांनी जपली सामाजिक बांधिलकी; भाविकांना सरबत वाटप



**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :-** तालुक्यातील गोळेगाव येथील नवसाला पावणारी व हाकेला धावणारी ग्रामदैवत श्री तारादेवी यांच्या दांडी पौर्णिमा यात्रोत्सवाचे आयोजन यंदा १ व २ फेब्रुवारी २०२६ रोजी मोठ्या भक्तिभावात करण्यात आले आहे. या भव्य यात्रोत्सवानिमित्त हजारो भाविक भक्त दर्शनासाठी दाखल होत असून यात्रेला उत्साहाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. या यात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर 'जगद्गुरु रामानंदाचार्य स्वामी नरेंद्राचार्य महाराज सेवा केंद्र, गोळेगाव' यांच्या वतीने भाविकांसाठी सामाजिक बांधिलकी जपत सरबत वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. विशेष बाब म्हणजे, हा उपक्रम आजी-माजी सैनिकांच्या हस्ते पार पडला. कडाक्याच्या उन्हात दर्शनासाठी आलेल्या भाविकांना थंडगार सरबत देत सैनिकांनी सेवेचा एक नवा आदर्श समाजापुढे ठेवला.

या उपक्रमात आजी-माजी सैनिकांसह सेवा केंद्राचे पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. भाविकांची गैरसोय होऊ नये तसेच यात्रेत सामाजिक सलोखा आणि सेवाभाव जपला जावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले. सरबत वाटपाच्या ठिकाणी सैनिकी शिस्त पाळत अत्यंत सुसूत्रपणे सेवा देण्यात येत होती.

यात्रोत्सवाच्या निमित्ताने धार्मिकतेसोबतच सामाजिक उपक्रमांनाही येथे मोठी चालना मिळत आहे. गोळेगावची यात्रा ही केवळ भक्तीच नव्हे, तर सामाजिक एकोप्याचे प्रतीक ठरत आहे. सैनिकांनी पुढाकार घेऊन राबविलेल्या या उपक्रमाचे भाविकांकडून भरभरून कौतुक करण्यात येत असून, अशा उपक्रमांमुळे यात्रेला एक वेगळीच उंची प्राप्त झाल्याची भावना भाविकांनी व्यक्त केली आहे.

# उरण–खोपटा मार्गावर मृत्यूचा सापळा!

## प्रवाशांचा आक्रोश – "आमचा जीव एवढा स्वस्त आहे का?"

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रणिता ठाकूर उरण रायगड :** उरण तालुक्यातील खोपटा–कोप्रोली–उरण हा महत्त्वाचा मार्ग आज अक्षरशः मृत्यूचा सापळा बनला आहे. या रस्त्यावरून प्रवास करणे म्हणजे जणू स्वतःच्या जीवाशी खेळ करण्यासारखे झाले आहे. गेले अनेक महिने रखडलेले रस्ते काम, मधोमध उकरलेले खड्डे, अर्धवट सोडलेले काँक्रीट काम आणि त्यातच जेएनपीए बंदरामुळे वाढलेली कंटेनरची प्रचंड वर्दळ — या सगळ्यांनी सामान्य नागरिकांचे जगणे असह्य केले आहे.

दुचाकीस्वार, चारचाकी चालक, शालेय बस, रुग्णवाहिका — प्रत्येक जण या मार्गावर जीव मुठीत धरून प्रवास करत आहे. रस्त्याच्या मधोमध असलेले खोल खड्डे, राडारोडा आणि कोणतीही योग्य सुरक्षा व्यवस्था नसल्यामुळे रात्रीचा प्रवास तर थेट धोक्याला आमंत्रण देणारा ठरत आहे. अपघात होण्यासाठी इथे फक्त एका क्षणाची चूक पुरेशी आहे.

दररोज हजारो कंटेनर वाहनांची ये-जा या मार्गावर होते. आधीच अरुंद



रस्ता आणि त्यात सुरू असलेली कामे यामुळे कंटेनरच्या लांबच लांब रांगा लागतात. त्या अवजड वाहनांच्या मधून वाट काढताना दुचाकीस्वार आणि छोट्या वाहनचालकांची अक्षरशः कसरत होते. नागरिकांच्या मनात एकच प्रश्न आहे —"प्रशासनाला आमचा जीव एवढा स्वस्त वाटतो का?"

या रस्त्यावरून दररोज कामावर जाणारे चाकरमानी उशिरा पोहोचतात. शालेय बस तासन्तास ट्रॅफिकमध्ये अडकतात. धुळीचे प्रचंड प्रमाण वाढल्यामुळे लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि श्वसनाच्या आजारांनी त्रस्त असलेले रुग्ण अधिक आजारी पडत आहेत.

**सर्वात वेदनादायक बाब म्हणजे —**

याच रस्त्यावरून गर्भवती महिला, हृदयविकाराचे रुग्ण, लहान मुले यांनाही प्रवास करावा लागतो. एखाद्या रुग्णाला तातडीने दवाखान्यात न्यायचे असेल तर या रस्त्यावरील अडथळे जीवघेणे ठरू शकतात. प्रत्येक धक्का, प्रत्येक खड्डा त्यांच्या वेदना वाढवत आहे. ही फक्त वाहतुकीची समस्या नाही, तर माणसांच्या आयुष्याशी खेळणारी परिस्थिती आहे.

सर्वात मोठा सवाल मात्र नियोजनावर उपस्थित होत आहे.रस्त्याचे एवढ्या मोठ्या प्रमाणात काम सुरू करण्याआधी प्रशासनाने योग्य पर्यायी मार्ग (डायव्हर्शन) उपलब्ध करून दिला असता, तर सामान्य नागरिकांना आज हा जीवघेणा त्रास सहन करावा लागला नसता, अशी भावना व्यक्त होत आहे. काम सुरू झाले, रस्ता खोदला गेला, पण नागरिक उपलब्ध केलेला पर्यायी रस्ता अतिशय निकृष्ट दर्जाचा रस्ता हाच जीवघेणा होत आहे अशी खंत लोक बोलून दाखवत आहेत.

आज परिस्थिती अशी आहे की,"रस्ता मधोमध बंद, दुसरा मार्ग निकृष्ट दर्जाचा , आणि पुढे फक्त धोका" — या अवस्थेत लोकांना रोज प्रवास करावा लागत आहे.हा केवळ दुर्लक्ष नाही, तर नागरिकांच्या सुरक्षिततेशी झालेली गंभीर तडजोड असल्याची भावना सर्वसामान्यांमध्ये पसरली आहे.

स्थानिक नागरिकांनी आता तीव्र संताप व्यक्त केला असून, उरण तालुक्यातील लोकप्रतिनिधी, स्थानिक नेते, प्रशासन आणि संबंधित विभागांनी तात्काळ या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देणे गरजेचे असल्याची मागणी जोर धरत आहे. निवडणुकांच्या वेळी मतांसाठी दार ठोठावणारे नेते आता या रस्त्यावरून एकदा प्रवास करून पाहावेत, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिक देत आहेत.

रस्त्याचे काम तातडीने पूर्ण करणे, योग्य सुरक्षा व्यवस्था उभारणे, पर्यायी मार्ग सुव्यवस्थित करून देणे, वाहतुकीचे शास्त्रीय नियोजन करणे आणि नागरिकांना सुरक्षित प्रवासाचा हक्क देणे — ही आता प्रशासनाची जबाबदारी नाही तर कर्तव्य आहे.कारण हा फक्त रस्ता नाही...हा हजारो कुटुंबांच्या जगण्याचा मार्ग आहे.आणि प्रत्येक जीव अमूल्य आहे.

# लाचलुचपत प्रतिबंधक च्या कारवाईत भुमी अभिलेख चे दोन अधिकारी अडकले

## फेरफारसाठी मागीतली होती पाच हजाराची लाच

**दैनिक युवक आधार**

**दिग्रस प्रतिनिधीउमेश साखरकर :** दिग्रस भूमीअभिलेख कार्यालय, येथील उपअधिक्षक व भूमापक या दोन शासकीय अधिकाऱ्यांना मालमत्तेच्या फेरफार प्रकरणात ५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ यांनी रंगेहात पकडल्याने एकच खळबळ उडाली आहे. ही कारवाई मंगळवार, दिनांक ३ फेब्रुवारी २०२६ रोजी करण्यात आली.

या प्रकरणात आरोपी भूमीअभिलेख कार्यालय उपअधीक्षक सखाराम नरसिंग पवार (वय - ४९) वर्षे व नझुल परिरक्षण भूमापक आशिष काशिनाथ शेलोकर (वय - ४७) रा. भूमीअभिलेख कार्यालय, दिग्रस यांना अटक करण्यात आली आहे. या प्रकरणातील महिला तक्रारदार यांच्या सासऱ्यांनी त्यांची मालकीची मालमत्ता तक्रारदार व त्यांच्या पतीस बक्षीसपत्राद्वारे दिली होती. सदर बक्षीसपत्रानुसार मालमत्तेचा फेरफार करून घेण्यासाठी तक्रारदार यांनी आवश्यक कागदपत्रे भूमीअभिलेख कार्यालय, दिग्रस येथे आरोपी आशिष शेलोकर यांच्याकडे सादर केली. त्यावेळी त्यांनी



तक्रारदार यांना उपअधिक्षक सखाराम पवार यांची भेट घेण्यास सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी उपअधिक्षक पवार यांची भेट घेऊन फेरफार करण्याची विनंती केली असता, त्यांनी या कामासाठी ५ हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप तक्रारदार यांनी केला. याबाबत तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, यवतमाळ येथे अधिकृत तक्रार दाखल केली.

तक्रारीच्या अनुषंगाने एसीबी पथकाने दिनांक ३ फेब्रुवारी रोजी पडताळणी कारवाई केली. या पडताळणीदरम्यान आरोपी आशिष शेलोकर यांनी फेरफार करण्यासाठी स्वतःसाठी व उपअधिक्षक यांच्यासाठी एकूण ५ हजार रुपयांची लाच स्वीकारण्यास मान्यता दिली. त्यानंतर आयोजित सापळा कारवाईदरम्यान आरोपी शेलोकर यांनी पंचासमक्ष तक्रारदार यांच्याकडून ५ हजार रुपये स्वीकारले. यापैकी अडीच हजार रुपये स्वतःकडे ठेवून उर्वरित अडीच हजार रुपये उपअधिक्षक सखाराम पवार यांना देताना दोन्ही आरोपींना उपअधिक्षकांच्या कक्षात रंगेहात पकडण्यात आले.

या प्रकरणी दिग्रस पोलीस स्टेशन येथे सविस्तर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून पुढील तपास सुरू आहे.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र बापू बांगर, अपर पोलीस अधीक्षक, अमरावती सचिंद्र शिंदे व पोलीस उपअधिक्षक अभय आष्टेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मनोज ओरके, अर्जुन घनवट व त्यांच्या पथकाने केली. दरम्यान, कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याने लाचेची मागणी केल्यास नागरिकांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, यवतमाळ कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन एसीबीकडून करण्यात आले आहे.

## नवीन पनवेल, मालेवाडी येथे प्रथमोपचार प्रशिक्षण शिबिर उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रणिता ठाकूर उरण रायगड :** दैनंदिन जीवनात अचानक उद्भवणाऱ्या लहान- मोठ्या दुखापती, अपघात किंवा आरोग्याशी संबंधित आपत्कालीन परिस्थितीमध्ये योग्य वेळी योग्य प्रथमोपचार मिळणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. "आपले शारीरिक आरोग्य चांगले असेल तरच आपण जीवनातील जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडू शकतो" या भावनेतून नवीन पनवेलमधील मालेवाडी येथे हिंदू जनजागृती समिती तर्फे प्रथमोपचार प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात "प्रथमोपचार आणि त्याचे दैनंदिन जीवनातील महत्त्व" या विषयावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. समाजातील प्रत्येक नागरिकाला प्राथमिक उपचारांचे ज्ञान असणे



आवश्यक आहे, या उद्देशाने विविध ठिकाणी असे प्रशिक्षण वर्ग घेतले जात असून, त्याच उपक्रमाचा एक भाग म्हणून मालेवाडी येथे हा वर्ग पार पडला.या प्रशिक्षण शिबिरात ९ जिज्ञासूंनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. प्रशिक्षणादरम्यान प्रथमोपचाराचा उद्देश, त्याची आवश्यकता आणि आपत्कालीन प्रसंगी घ्यावयाची तत्काळ काळजी याबाबत माहिती देण्यात आली.

यामध्ये विशेषतः –जखम झाल्यास तात्काळ करावयाची उपचारपद्धती रक्तस्राव थांबवण्याचे प्राथमिक उपाय,पाय मुरगळल्यास किंवा सूज आल्यास करावयाची काळजी,किरकोळ दुखापतींवर घरच्या घरी करता येणारे प्रथमोपचार याबाबत प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करण्यात आले.प्रशिक्षणानंतर सहभागी जिज्ञासूंनी समाधान व्यक्त करत, "हे ज्ञान आमच्यासाठी अत्यंत उपयुक्त असून, यामुळे आपत्कालीन प्रसंगी घाबरून न जाता योग्य प्रथमोपचार करण्याचा आत्मविश्वास मिळाला," असे सांगितले.

या उपक्रमामुळे स्थानिक नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण होण्यास मदत झाली असून, भविष्यातही असे प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

# शेतकरी हितासाठी काय करावे

भारत हा कृषिप्रधान देश आहे. आपल्या देशाची ओळखच शेती आणि शेतकऱ्यांशी जोडलेली आहे. देशातील बहुतांश लोकसंख्या थेट किंवा अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे. शेतकरी हा समाजाचा अन्नदाता आहे. तो आपल्या कष्टातून संपूर्ण देशाला अन्न पुरवतो. मात्र असे असूनही आजचा शेतकरी अनेक समस्यांनी वेढलेला आहे. आर्थिक अडचणी, नैसर्गिक आपत्ती, कर्जबाजारीपणा, बाजारातील अस्थिरता आणि सामाजिक उपेक्षा यामुळे शेतकऱ्यांचे जीवन अत्यंत कठीण झाले आहे. त्यामुळे शेतकरी हितासाठी ठोस, प्रभावी आणि दीर्घकालीन उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे.

**शेतकऱ्यांची सद्यस्थिती**

आजचा शेतकरी विविध प्रकारच्या संकटांचा सामना करत आहे. अनिश्चित पावसामुळे शेती धोक्यात येते. कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टी, गारपीट किंवा पूर यांमुळे पिकांचे मोठे नुकसान होते. दुसरीकडे खत, बियाणे, कीटकनाशके, वीज, पाणी आणि मजुरी यांचा खर्च सातत्याने वाढत आहे. मात्र शेतमालाला मिळणारा दर मात्र त्या प्रमाणात वाढत नाही. त्यामुळे शेतकरी कायम आर्थिक तणावात असतो.

कर्ज घेऊन शेती करणे ही अनेक शेतकऱ्यांची मजबुरी झाली आहे. पीक फसल्यानंतर कर्ज फेडता न आल्याने शेतकरी निराश होतो. या निराशेतून काही शेतकरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलतात. ही परिस्थिती अत्यंत गंभीर असून संपूर्ण समाजासाठी चिंतेची बाब आहे.

**१) पाण्याची उपलब्धता आणि जलसंधारण**

शेतीचा पाया म्हणजे पाणी. भारतातील बहुतांश शेती पावसावर अवलंबून आहे. पाऊस वेळेवर झाला नाही किंवा जास्त झाला तर पिकांचे नुकसान होते. त्यामुळे पाण्याचे योग्य नियोजन करणे अत्यंत आवश्यक आहे. जलसंधारण ही काळाची गरज बनली आहे.

शेततळे, बंधारे, चेकडॅम, नालाबांधणी, विहिरींचे पुनर्भरण, पर्जन्यजलसंधारण यासारख्या उपाययोजना मोठ्या प्रमाणावर राबविल्या पाहिजेत. ठिबक व तुषार सिंचन पद्धतींचा वापर केल्यास पाण्याची बचत होऊन उत्पादनात वाढ होऊ शकते. शासनाने या योजनांना आर्थिक मदत देऊन शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

**२) शेतमालाला योग्य दर व हमीभाव**

शेतकऱ्यांच्या समस्यांमधील सर्वात मोठी समस्या म्हणजे शेतमालाला योग्य किंमत न मिळणे. अनेक वेळा शेतकऱ्याला उत्पादन खर्चही वसूल होत नाही. दलालांच्या माध्यमातून माल विकावा लागल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होते.

यासाठी किमान आधारभूत किंमत (MSP) प्रभावीपणे लागू करणे गरजेचे आहे. शेतकरी बाजार, थेट ग्राहक बाजार, आठवडी बाजार, ई-नाम (e-NAM) यांसारख्या उपक्रमांमुळे शेतकरी थेट ग्राहकांशी जोडला जाऊ शकतो. शेतकरी उत्पादक कंपन्या (FPO) आणि सहकारी संस्थांना बळकटी दिल्यास शेतकऱ्यांची बाजारातील ताकद वाढेल.

**३) आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर**

आज विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे शेतीत मोठे बदल घडू शकतात. माती परीक्षण करून योग्य पिकांची निवड, सुधारित बियाण्यांचा वापर, संतुलित खत व्यवस्थापन, कीड व रोग नियंत्रणासाठी आधुनिक उपाय, हवामानाचा अचूक अंदाज या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या आहेत.

ड्रोन, यांत्रिक अवजारे, ट्रॅक्टर, स्मार्ट शेती, मोबाईल ॲप्स यांचा वापर केल्यास शेती अधिक सोपी आणि फायदेशीर होऊ शकते. मात्र अनेक शेतकरी या तंत्रज्ञानापासून दूर आहेत. त्यामुळे प्रशिक्षण शिबिरे, कृषी मार्गदर्शन केंद्रे आणि विस्तार सेवांचा प्रभावी वापर करणे गरजेचे आहे.

**४) कर्जव्यवस्था, पीकविमा आणि आर्थिक सुरक्षितता**

शेतकरी कर्जबाजारीपणात अडकलेला आहे. पीक लागवडीसाठी त्याला कर्ज घ्यावेच लागते. नैसर्गिक आपत्तीमुळे पीक नष्ट झाल्यास हे कर्ज फेडणे कठीण होते. कर्जमाफी हा तात्पुरता उपाय असला तरी तो कायमस्वरूपी समाधान देत नाही.

त्याऐवजी कमी व्याजदरात पीककर्ज, वेळेवर कर्ज उपलब्धता, प्रभावी पीकविमा योजना आणि नुकसान भरपाई लवकर मिळणे आवश्यक आहे. पीकविमा योजना शेतकरी-केंद्रित, पारदर्शक आणि सोपी असली पाहिजे. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षितता मिळेल.

**५) शिक्षण व प्रशिक्षणाचे महत्त्व**

शेतकरी हितासाठी शिक्षण हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. पारंपरिक शेतीसोबतच आधुनिक शेतीचे ज्ञान शेतकऱ्यांना मिळाले पाहिजे. बाजारपेठेची माहिती, मागणी-पुरवठा, साठवणूक, प्रक्रिया उद्योग, निर्यात संधी यांचे ज्ञान असल्यास शेतकरी अधिक फायदेशीर निर्णय घेऊ शकतो.

शेतकऱ्यांच्या मुलांना चांगले शिक्षण मिळाले पाहिजे. कृषी शिक्षणाला प्रोत्साहन दिल्यास तरुण पिढी शेतीकडे आधुनिक दृष्टिकोनातून पाहू शकते. डिजिटल साक्षरता वाढवून शासकीय योजनांचा लाभ थेट घेता येईल.

**६) शेतीपूरक व्यवसायांचा विकास**

फक्त पारंपरिक शेतीवर अवलंबून राहणे आज जोखमीचे आहे. त्यामुळे शेतीपूरक व्यवसायांना चालना देणे अत्यंत गरजेचे आहे. दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन, मत्स्यपालन, मधुमक्षिका पालन, फळबागा, भाजीपाला लागवड यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढू शकते.

तसेच अन्नप्रक्रिया उद्योग, थंडगृह, साठवणूक केंद्रे, वाहतूक सुविधा उपलब्ध झाल्यास शेतमालाची नासाडी टाळता येईल. शेतीला उद्योगाचे स्वरूप दिल्यास शेतकरी आत्मनिर्भर होऊ शकतो.

**७) सेंद्रिय आणि शाश्वत शेती**

रासायनिक खतांचा आणि कीटकनाशकांचा अति वापर केल्यामुळे मातीची सुपीकता कमी होत आहे तसेच मानवी आरोग्यावरही परिणाम होत आहे. त्यामुळे सेंद्रिय शेती, नैसर्गिक शेती आणि शाश्वत शेती पद्धतींचा अवलंब करणे आवश्यक आहे.

या पद्धतीमुळे उत्पादन खर्च कमी होतो, मातीची गुणवत्ता टिकून राहते आणि शेतमालाला चांगला दर मिळतो. शासनाने सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन देऊन बाजारपेठ उपलब्ध करून दिली पाहिजे.

**८) सामाजिक व मानसिक आधार**

आज शेतकऱ्यांमध्ये वाढणाऱ्या आत्महत्यांचे प्रमाण ही गंभीर सामाजिक समस्या आहे. आर्थिक अडचणींसोबतच मानसिक तणाव, अपयशाची भावना, सामाजिक दबाव यामुळे शेतकरी खचून जातो. यासाठी समुपदेशन केंद्रे, मानसिक आरोग्य सेवा, स्वयंसेवी संस्थांचा सहभाग आवश्यक आहे.

कुटुंब, समाज आणि शासन यांनी शेतकऱ्यांना मानसिक आधार दिला पाहिजे. शेतकऱ्यांचा सन्मान केला गेला पाहिजे आणि त्यांच्या कामाचे महत्त्व समाजात अधोरेखित झाले पाहिजे.

**९) शासन, समाज आणि नागरिकांची जबाबदारी**

शेतकरी हितासाठी शासनाने शेतकरी-केंद्रित धोरणे प्रभावीपणे राबवली पाहिजेत. योजना फक्त कागदावर न राहता प्रत्यक्षात शेतकऱ्यांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. समाजाने शेतकऱ्यांच्या समस्या समजून घेतल्या पाहिजेत.

ग्राहकांनी शेतमालाला योग्य किंमत देण्याची तयारी ठेवली पाहिजे. युवकांनी शेतीकडे आधुनिक आणि सकारात्मक दृष्टीने पाहिले पाहिजे. ग्रामीण भागात रोजगार निर्मिती झाल्यास शहरांकडे होणारे स्थलांतर कमी होईल.

**निष्कर्ष**

शेतकरी हा देशाचा आधारस्तंभ आहे. शेतकरी सुखी, सक्षम आणि आत्मनिर्भर झाला तरच देशाची खरी प्रगती होऊ शकते. शेतकरी हितासाठी पाणी, योग्य बाजारभाव, आधुनिक तंत्रज्ञान, शिक्षण, आर्थिक आणि मानसिक आधार या सर्व बाबींवर एकत्रितपणे काम करणे आवश्यक आहे.

"शेतकरी वाचला तरच देश वाचेल" ही भावना प्रत्येक नागरिकाने मनात बाळगली पाहिजे. तेव्हाच शेतकऱ्यांचे जीवन समृद्ध होईल आणि भारत खऱ्या अर्थाने प्रगत राष्ट्र बनेल.

**लेखक : यश संभाजी शिंदे**
**गोंदेगाव**

# वाचक आहेत...लेखकांनी वाचकांपर्यंत पोहोचले पाहिजे - अशोक कुबडे

## प्रकट मुलाखतीत कादंबरीकार अशोक कुबडे यांचे परखड मत...

**दैनिक युवक आधार**

**नांदेड प्रतिनिधी प्रकाश गवारे :** मराठी वाचक आजही मोठ्या प्रमाणात पुस्तक विकत घेऊन वाचत आहे.वाचन संस्कृती ही कायम आहे. चांगली पुस्तके वाचण्यासाठी वाचकांची धडपड सुरू असते.चांगली वैचारिक पुस्तके वाचक शोधत असतो आणि तो विकत घेऊन वाचत असतो. वाचक मिळत नाही ही ओरड केवळ पळवाट असून चांगलं साहित्य वाचणारी वाचक आहेत. या मताशी मी ठाम आहे. असे मत प्रसिद्ध कादंबरीकार अशोक कुबडे यांनी प्रकट मुलाखतीत व्यक्त केले.

अक्षरोदय साहित्य मंडळ आणि मातोश्री भागाबाई डोंगरे या साहित्यिक संस्थांनी आयोजित केलेल्या प्रकट मुलाखतीत ते मुलाखतकार पंडित पाटील बेळीकर यांच्या प्रश्नाचे उत्तर देत होते. दर्जेदार साहित्य लेखनाची प्रसिद्धी आणि वाचकांचा शोध घेऊन त्यांच्यापर्यंत आपलं पुस्तक पोहोचवण्यास लेखक तयार नसून वाचक मिळत नाहीत या नावाखाली लेखक हा आळशी होताना दिसतो आहे. पण वैचारिक आणि दर्जेदार पुस्तकाचे वाचन करण्यास वाचक मोठ्या प्रमाणात उत्सुक आहेत त्यांची उत्सुकता ओळखून त्यांच्यापर्यंत पोहोचणे गरजेचे आहे. ते आजच्या लेखकांनी केलं पाहिजे आपल्या पुस्तकाची जाहिरात आणि आपलं पुस्तक वाचकांपर्यंत कशा पद्धतीने जाईल याकडे लक्ष देऊन तशी तयारी आणि नियोजन लेखकांनी करावे. केवळ पुस्तक प्रकाशित करून न थांबता सोशल मीडिया आणि विविध माध्यमाचा वापर करून लेखकांनी वाचकांचा शोध घ्यावा.असे परखड मत अशोक कुबडे यांनी यावेळी मांडले. मुलाखतकार पंडित पाटील बेळीकर यांनी



अशोक कुबडे यांना बोलत केलं त्यांच्या बालपणातील आठवणी पासून ते शिक्षण तसेच साहित्य लेखनाकडे झालेली वाटचाल त्यातून कवी कट्टा या साहित्यिक चळवळीचा जन्म आणि त्यातून मिळालेले साहित्यिक मित्र यावर अशोक कुबडेंना बोलत केलं. 'गोंडर' कादंबरीच्या निमित्ताने कादंबरीच्या हजारो प्रति विकल्या गेल्या असून महाराष्ट्रातील 30 राज्यस्तरीय पुरस्काराने ही कादंबरी सन्मानित झाली आहे. कादंबरी प्रकाशित झाल्यानंतर या पुरस्काराच्या निमित्ताने अशोक कुबडे यांचा झांजावाती दौरा सबंध महाराष्ट्रभर झाला. हे संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले आहे. पुरस्काराबद्दल सध्या साहित्यात आणि सामाजिक क्षेत्रामध्ये फारसे चांगले बोलले जात नाही. या प्रश्नाचे उत्तर देतांना अशोक कुबडे यांच्या गोंडर कादंबरीला महाराष्ट्रातील नामवंत तीस पुरस्कारातून दोन लाख तीस हजार एवढी रक्कम प्राप्त झाली असल्याचे अशोक कुबडे यांनी सांगितले त्यामुळे दर्जेदार साहित्य लिहा. आपोआपच तुम्हाला दर्जेदार पुरस्कार मिळतील तुमचा सन्मान होईल सत्कार होईल आणि वाचक तुमच्या साहित्याची उत्सुकतेने वाट पाहतील असेही अशोक कुबडे यावेळी म्हणाले माझ्या गोंडर पुस्तकाची एकही प्रत सध्या शिल्लक नसून लवकरच महाआवृत्ती येत आहे. इसाप प्रकाशनाने गोंडर कादंबरी मानधनासह स्वीकारून त्यावर रॉयल्टी दिली आहे आणि संपूर्ण खर्च प्रकाशनाने उचलला आहे. हे संधी दर्जेदार साहित्य लेखनास मिळते. नाहीतर अलीकडे पुस्तके छापून घरी गठ्ठयांची थप्पी मारलेली जाते कुणी विचारण्यास तयार नसते पण गोंडर ही कादंबरी संबंध महाराष्ट्रभर प्रचंड विकल्या गेली.लवकरच महावृत्ती येऊन वाचकांची उत्सुकता ओळखून त्यांच्यापर्यंत पोहोचवली जाणार असल्याचे अशोक कुबडे यांनी सांगितले.

प्रकट मुलाखती दरम्यान त्यांनी त्यांच्या तळणी गावापासूनचा संपूर्ण प्रवास,साहित्य लेखन, साहित्य चळवळ, कादंबरीचे यश,पुरस्कार प्राप्तीचा आनंद आणि कादंबरीतील पात्र कादंबरी लिहिण्यामागची भूमिका आणि कादंबरीचे एकूण यशाबद्दल अशोक कुबडे मुलाखतीतून दिलखुलासपणे व्यक्त झाले. त्यांना विविध प्रश्न विचारून परखडपणे बोलण्यास भाग पाडणारे मुलाखतकार पंडित पाटील बेळीकर यांनी अशोक कुबडेंना परखड प्रश्न विचारून सखोल बोलण्यासाठी तयार केले. ही दिलखुलास मुलाखत रसिकांच्या मनात कायम राहील अशीच पार पडली.

प्रकट मुलाखत सुरू असताना इसाप प्रकाशनाचे संचालक दत्ता डांगे,विजयकुमार चित्तरवाड, कादंबरीकार मोतीराम राठोड, प्रसिद्ध गझलकार आतम गेंदे, गझलकार चंद्रकांत कदम,रूपाली वगैरे, ज्योती गायकवाड,गोदावरी गायकवाड,अर्चना कुबडे,अनुरत्न वाघमारे, समीक्षक गंगाधर ढवळे,जीवन मांजरमकर, शंकर माने, कवी गजानन सोनवणे, रुपेश मुनेश्वर, आयोजक सदानंद सपकाळे, नागोराव डोंगरे, रामचंद्र कुबडे, ज्योती परांजपे,अलका मुकटकर, प्रतिभा पांडे, माधव राहते, आदी साहित्यातील मान्यवर मंडळी कवी लेखक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# सहाय्यक पोलिस निरीक्षक विलास पवार यांचे सत्कार

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी/महादेव उप्पे :** दि.०५)देगलूर तालुक्यातील मौजे हणेगाव येथे मागील अनेक वर्षांपासून चोरीचे प्रमाण वाढले असून व्यापाऱ्यांमध्ये भितीचे वातावरण पसरले होते,यामध्ये पोलिसांना यश मिळत नसल्याची खंत सतावत होती. याच गोष्टीची जान ठेवून मरखेल पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास पवार व पोलीस कॉन्स्टेबल सय्यद व पोलीस कॉन्स्टेबल चालक सोनकांबळे यांनी आपली टिम घेऊन रात्रभर गस्त घालत होते.परंतू चोरांना याची जान नव्हती.दि.३० जानेवारी २०२६ च्या मध्यरात्री गस्तीच्या वेळेस दबंग स्टाईल मध्ये चोरट्यांना पकडण्यात मरखेल पोलीस ठाण्याचे




सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास धोंडिराम पवार व त्यांच्या टीमला चोरट्यांना पकडण्यात यश आले.

या यशाबद्दल मरखेल पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक विलास पवार व त्यांच्या टिमचे अभिनंदन व सत्कार देगलूर शिवसेना तालुकाप्रमुख बालाजी पाटील इंगळे खुतमापुरकर यांच्या वतीने करण्यात आला.

# मोगर्रा येथे नवे ग्रामपंचायत भवन तसेच 1 कोटी 90 लाखांच्या विविध विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन सम्पन्न

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड/प्रतिनिधी जिल्हा गोंदिया :** गोंदिया विधानसभा क्षेत्राचे जनतेचे आमदार विनोद अग्रवाल यांनी आज ग्राम मोगर्रा येथे नवीन ग्रामपंचायत भवनासह सुमारे 1 कोटी 90 लाख रुपयांच्या विविध विकासकामांची भेट गावाला दिली.

विविध लोकार्पण व भूमिपूजन कार्यक्रमात ग्रामस्थांना संबोधित करताना आमदार विनोद अग्रवाल म्हणाले, "मी आमदार नसताना देखील या गावात तुमच्या भेटीला येत होतो. त्या काळात गावाचा विकास कोसो दूर होता. ना रस्ते होते, ना कोणतेही विकासकाम. कार्यकर्त्यांच्या मागणीवरून आम्ही मोगर्र्याच्या विकासाला सुरुवात केली. आज पाच वर्षांच्या आमच्या कार्यकाळात मोगर्रा विकासाच्या मार्गावर वेगाने पुढे जात आहे."

ते पुढे म्हणाले, "जनतेने आम्हाला जनसेवक म्हणून निवड दिली. गावाची उन्नती आणि सर्वसामान्यांच्या प्रगतीसाठी काम करणे हीच माझी जबाबदारी आहे. व्यक्तिगत शासकीय योजनांचे लाभ लोकांपर्यंत पोहचवण्याबरोबरच गावात महिला बचत भवन, कृषि गोदाम, शाळा इमारत, नवे ग्रामपंचायत भवन, रस्ते, वीज, पाणी, वाचनालय, सौंदर्यीकरण तसेच इतर गावांशी जोडणाऱ्या रस्त्यांचे



रुंदीकरण अशा अनेक कामे आम्ही केली आहेत."

आमदार अग्रवाल म्हणाले, "गोंदिया विधानसभा क्षेत्रात 15 वर्षांच्या प्रतिनिधित्वात 5 हजार लोकांना घरकुलाचा लाभ मिळाला, तर आमच्या 5 वर्षांच्या कार्यकाळात आम्ही 40 हजार गरजूंचे घरे मंजूर केली. 90 टक्के जनतेपर्यंत शासनाच्या रेशन योजनेचा लाभ पोहोचवला. 36 हजार निराधार व श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांना देखील योजना मिळवून देण्याचे काम केले."

या 1 कोटी 90 लाख रुपयांच्या लोकार्पण व भूमिपूजन कार्यक्रमाला आमदार विनोद अग्रवाल यांच्यासह पंचायत समिती सभापती मुनेश रहांगडाले, सोनुलाताई बरेले, सरपंच रिताबाई लिल्हारे, उपसरपंच दिलीपसिंह मुंडेले, सुजीत येवले, ओमकार नागपुरे, अनिताबाई नेवरे, मोतीराम नैकाने, अनिल कुसराम, अनिल नागपुरे, अनुसया गुरबेले, सुनिताबाई नागपुरे, तिलकचंद घोरमारे यांच्यासह ग्रामस्थ व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सहकार महर्षी माणिकराव पालोदकर विद्यालयात इयत्ता १० वी व १२ वीचा निरोप समारंभ उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी योगेश पालोदकर/ सिल्लोड :** तालुक्यातील पालोद येथील सहकार महर्षी माणिकराव पालोदकर विद्यालयात इयत्ता दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ अत्यंत उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व स्वागत गीताने करण्यात आली.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जि . प. पालोदचे मुख्याध्यापक दिलीप सपकाळ होते, तर महाविद्यालयाचे प्राचार्य ज्ञानेश्वर काकडे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख पाहुणे म्हणून लॉजिक कॉम्प्युटरचे संचालक जितेंद्र पाडवे यांनी




विद्यार्थ्यांना करिअर संदर्भात मोलाचे मार्गदर्शन केले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून शिक्षकांनी शालेय जीवनात शिस्त, संस्कार व गुणवत्ता वाढीसाठी घेतलेल्या कठोर मेहनतीबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. निरोप घेताना अनेक विद्यार्थी व शिक्षक भावूक झाल्याचे पाहायला मिळाले. कार्यक्रमादरम्यान महाविद्यालयात आयोजित स्पर्धा परीक्षा, वकृत्व स्पर्धा व विविध क्रीडा प्रकारातील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांनी शाळेला आठवण म्हणून भेटवस्तू प्रदान केली.

प्राचार्य ज्ञानेश्वर काकडे यांनी प्रास्ताविकात विद्यालयाच्या यशाच्या परंपरेची ओळख करून दिली. प्रा. योगेश निंभोरे यांनी विद्यार्थ्यांना व्यावसायिक दृष्टिकोन आत्मसात करण्याचे आवाहन केले . प्रमुख पाहुणे जितेंद्र पाडवे यांनी करिअरच्या संधी, वेळेचे नियोजन व तंत्रज्ञानाचा सदुपयोग यावर प्रकाश टाकला. अध्यक्षीय भाषणात दिलीप सपकाळ यांनी सत्य, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर यश संपादन करण्याचा संदेश दिला.


कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयश्री चापे यांनी केले तर आभार कृष्णा पाटील यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यालयाचे शिक्षक दिलीप जाधव, प्रदीप कानडजे, कृष्णा भांडारे, सुनील तांबे, राजेश ठोंबरे, सुनील सागरे, भास्कर केरले, महादेवी ठवरे, प्रफुल कळम, विकी चांदुरकर, गजानन सपकाळ, डॉ. गणेश दिवटे, डॉ. रमेश काळे, संजय जाधव व अक्षय निकम यांनी विशेष परिश्रम घेतले. या सोहळयाला बहुसंख्य विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.

# तरुणाचा धबधब्यात बुडून दुर्दैवी अंत

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी/सय्यद इसा :** माहूर परिसरातील प्रसिद्ध शेख फरीद बाबा वझरा येथील धबधब्यात बुडून एका ३२ वर्षीय तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना मंगळवार (दि.३ फेब्रुवारी) दुपारी १ ते २ वाजेदरम्यान घडली. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

मृत तरुणाचे नाव शेख इर्शाद शेख रफिक (वय ३२, रा. गोकुंदा, ता. किनवट) असे आहे. शेख इर्शाद हा आपल्या मित्रांसोबत माहूर येथील शेख फरीद बाबा दर्गावर दर्शनासाठी आला होता. दर्शन



आटोपल्यानंतर दर्गालगत असलेल्या धबधब्याजवळ पाणी आणण्यासाठी गेला होता. अचानक त्याचा तोल गेला व तो खोल पाण्यात पडला. धबधब्यातील पाण्याची खोली आणि प्रवाहाचा अंदाज न आल्याने तो पाण्यात बुडाला. त्याच्यासोबत असलेल्या मित्रांनी व स्थानिक नागरिकांनी तत्काळ धाव घेऊन त्याला पाण्याबाहेर काढले. मात्र तोपर्यंत उशीर झाला होता. पाण्यात बुडाल्याने त्याचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. या संदर्भात माहूर पोलीस ठाण्यात संपर्क साधला असता, या घटनेबाबत अद्याप कोणतीही अधिकृत तक्रार दाखल नसल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. या दुर्दैवी घटनेमुळे हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. शासनाने याकडे लक्ष घालून या धबधब्याला संरक्षण कटघरे उपलब्ध करून द्यावेत अशी मागणी जनतेतून जोर धरत आहे.

# रोखपाल दिलीप मगर यांचा ३५ वर्षांच्या सेवेनंतर गौरव

## माणिकनगर जिल्हा बँकेत सेवानिवृत्तीनिमित्त सपत्नीक सत्कार

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** माणिकनगर (ता. सिल्लोड) येथील छत्रपती संभाजीनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे रोखपाल दिलीप मगर हे ३५ वर्षांच्या प्रदीर्घ आणि निष्कलंक सेवेनंतर ३१ जानेवारी रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त बँकेच्या वतीने त्यांचा व सौ. अनिता मगर यांचा शाल आणि पुष्पगुच्छ देऊन सपत्नीक भावपूर्ण सत्कार करण्यात आला.दिलीप मगर यांनी आपल्या प्रदीर्घ कार्यकाळात अत्यंत संयमाने आणि तत्परतेने ग्राहकांना सेवा दिली. रोखपाल सारख्या जबाबदारीच्या पदावर काम करताना त्यांनी बँकेचा आणि खातेदारांचा विश्वास सार्थ ठरवला, अशा भावना यावेळी मान्यवरांनी व्यक्त केल्या.या निरोप समारंभास शाखा व्यवस्थापक शेखर देशमुख ,



महेंद्र पवार, शाखा व्यवस्थापक महेश पाटील, सुनील काळे, नामदेवराव आहेर, अविनाश तायडे, रामदास सुलताने यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांचे अध्यक्ष, संचालक, बँकेचे कर्मचारी, खातेदार आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे छायाचित्रण रघुनाथ बोराडे यांनी केले.

# निवडणुकीच्या अनुषंगाने पनवेल शहराच्या वाहतुकीत बदल

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** रायगड जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वजनिक निवडणूक २०२० या कार्यक्रम जाहीर झाल्यानंत निवडणूक प्रशासन आणि चाहतूक पोलिसांनी आवश्यक तयारीला सुरुवात केली आहे. त्यासाठ मतदान साहित्य संकलन, वितरण तसेच मतमोजणीसाठी विठोबा खंडप्पा हायस्कूल (व्ही. के हायस्कूल), पनवेल हे केंद्र निश्चित करण्यात आले आहे या निवडणुकीअंतर्गत पनवेल तालुक्यात ८ जिल्हा परिषद गट आणि १६ पंचायत समिती गणांसाठी मतदान होणार आहे . त्यासाठी ६, ७ आणि १९ फेब्रुवारी रोजी पनवेलमधील वाहतुकीत बदल करण्यात आला आहे.

निवडणूक कर्तव्य बजावणाऱ्या पोलिंग पाट्यांच्या वाहतुकीसाठी ६ फेब्रुवारी रोजी व्ही. के. हायस्कूल परिसरात एकूण ३७ बसेस, २९ मिनी बसेस, २१ इको कार व ४४ इटिंगा कार नेमण्यात येणार आहेत. तसेच ७फेब्रुवारी रोजी मतदान पेट्या याच ठिकाणी स्ट्रॉगरूममध्ये ठेवण्यात येणार असल्याने परिसरात मोठ्या प्रमाणात वाहनांची ये-जा होणार आहे. या पाश्र्वभूमीवर निवडणूक प्रक्रियेतील वाहनांव्यतिरिक्त इतर सर्व वाहनांसाठी ६ फेब्रुवारी रोजी दुपारी १ वाजल्यापासून ते ७ फेब्रुवारी रोजी रात्री १२ वाजेपर्यंत अमरधाम स्मशानभूमी ते व्ही. के. हायस्कूल-वडाळे तलाव विसर्जन घाट मार्ग. वडाळे तलाव बिट चौकीकडून व्ही. के. हायस्कूलकडे ये-जा करणारा रस्ता. नवीन पनवेल सिग्नलकडून व्ही. के. हायस्कूलकडे ये-जा करणारा रस्ता आणि नवीन पनवेल सिग्नलकडून अमरधामकडे जाणारा संव्हिस रस्ता या मार्गावर बंदी ग्रहणार आहे. तर, ९ फेब्रुवारी रोजी मतमोजणी प्रक्रियेच्या दिवशी सकाळी ५ ते मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अमरधाम ते व्ही. के. हायस्कूल वडाळे तलाव विसर्जन घाट मार्ग आणि नवीन पनवेल सिग्नलकडून व्ही, के, हायस्कूलकडे ये-जा करणारा रस्ता बंद ठेवण्यात येणार असल्याची अधिकृत अधिसूचना वाहतूक पोलीस उपायुक्त तिरुपती काकडे यांनी जारी केली आहे. अमरधाम ते व्ही. के. हायस्कूल मार्ग बंद असताना या मार्गावरील वाहने अमरचाम-पनवेल कोर्ट- सावरकर चौक किंवा अमरधाम नवीन पनवेल सिग्नल-लाईन आळी मार्ग जातील. वहाळे तलाव बिट चौकीकडील रस्ता बंद असल्यास अमरधाम-पनवेल कोर्ट-सावरकर चौक किंवा नवीन पनवेल सिग्नल-लाईन आळी मार्ग वापरण्यात येईल. नवीन पनवेल सिग्नलकडून व्ही. के. हायस्कूलकडे जाणाऱ्या कहनांनी लाईन आळी किंवा अमरवाम-पनवेल कोर्ट-सावरकर चौक मार्ग प्रवास करावा. नवीन पनवेल सिग्नाल से अमरधाम सर्व्हिस रोड बंद असताना वाहनांनी गार्डन हॉटेल सिग्नल मार्ग मुख्य रस्त्याचा चापर करावा. ही वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, अग्निशमन दल, रुग्णवाहिका, शासकीय वाहने तसेच निवडणूक व अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही, असेही वाहतूक पोलिसानी स्पष्ट केले आहे.

# रिसोडच्या प्रशासनाला अभिमानाचा क्षण!
## कर्तव्यदक्ष तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर मॅडम यांना ‘राष्ट्रमाता जिजाऊ पुरस्कार’ – लोकसेवेचा तेजस्वी गौरव!

**दैनिक युवक आधार**

**रणजीतसिंह ठाकुर/रिसोड तालुका प्रतिनिधी :** रिसोड तालुक्याच्या कर्तव्यदक्ष, संवेदनशील आणि लोकाभिमुख तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर मॅडम यांना महिला सक्षमीकरण, उत्कृष्ट प्रशासन व सामाजिक बांधिलकीतील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रतिष्ठित ‘राष्ट्रमाता जिजाऊ पुरस्कार’ प्रदान करण्यात आला.

प्रशासन म्हणजे केवळ कागदोपत्री कारभार नव्हे, तर सामान्य माणसाच्या दुःखात धावून जाणारी व्यवस्था असावी — हे प्रतीक्षा तेजनकर मॅडम यांनी आपल्या कामातून दाखवून दिले आहे. महिलांसाठी राबवलेले उपक्रम, तक्रार निवारणातील तत्परता, कायदा व सुव्यवस्थेची प्रभावी अंमलबजावणी आणि युवकांशी थेट संवाद साधत त्यांनी रिसोड तालुक्यातील प्रशासनाला लोकाभिमुख चेहरा दिला आहे.

त्यांच्या कर्तव्यदक्ष, शिस्तबद्ध आणि संवेदनशील प्रशासनामुळे रिसोड तालुक्यातील सामान्य जनता, महिला व युवकांचा त्यांच्यावर मोठा विश्वास निर्माण झाला आहे.या गौरवाबद्दल रिसोड तालुक्यातील सामाजिक, शैक्षणिक व



प्रशासकीय स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

तहसील कार्यालयात सत्कार सोहळा

या गौरवाच्या निमित्ताने तहसील कार्यालय, रिसोड येथे दर्शनसिंह ठाकूर यांच्या हस्ते तेजनकर मॅडम यांचा शाल, श्रीफळ व गुलदस्ता देऊन सत्कार करण्यात आला.

या वेळी उपस्थित होते —भाजपा माजी शहराध्यक्ष नंदकिशोर मगर, सुनील लाटे, विठ्ठल आवचार, बंडूभाऊ डहाके, प्रथमेश जिरवणकर, विशाल गवळी, शिवाजी गाढवे व सहली मित्रमंडळी.

# सदभावना चषक क्रिकेट स्पर्धा 2026
## सुपरकॉप इलेवन पोलीस कर्मचाऱ्यांनी जिंकली ट्रॉफी

**दैनिक युवक आधार**

**जाफराबाद तालुका प्रतिनिधी/ अशोक म्हस्के :** जाफराबाद येथील जिल्हा परिषद प्रशाला शाळेच्या मैदानावर दरवर्षीप्रमाणे याही वर्षी डॉक्टर, महसूल पंचायत समिती, कृषी विभाग व पोलीस कर्मचारी यांच्या वतीने सदभावना चषक क्रिकेट स्पर्धा 2026 पर्व तिसऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. या अगोदर दोन वर्षापासून असे सामने कर्मचाऱ्यांचे ठेवण्यात आलेले होते. डॉक्टर व कर्मचारी यांना आपल्या कामाच्या ताणतणातून त्यांच्यामध्ये असलेले खेळाडू गुणाचे नावलौकिक व्हावे. व त्यांच्यामध्ये असलेले गुणाना चांगला प्रकारचे प्रोत्साहन मिळावे, डॉक्टर्स कर्मचारी यांना उत्साह निर्माण व्हावा या उद्देशाने असे क्रिकेट सामने ठेवले जातात. सद्भावना चषक क्रिकेट स्पर्धा 2026 पर्व तिसरे या मध्ये पाच टीमने



सहभाग नोंदवला होता.टीम (१ )जे. डी. ए.( डॉक्टर संघटना जाफराबाद) टीम( २) महसूल वॉरियर्स( तहसील कार्यालय जाफराबाद), टीम( ३) बळीराजा इलेवन ( तालुका कृषी कार्यालय जाफराबाद ) टीम (४) ग्रामविकास - ११ ( पंचायत समिती कार्यालय जाफराबाद ) टीम (५) सुपरकॉप इलेवन ( पोलीस स्टेशन जाफराबाद व पोलीस ठाणे टेंभुर्णी ) असे होते. सदर क्रिकेट सामन्यामध्ये पोलीस कर्मचारी संघ व पंचायत समिती कर्मचारी संघ यांच्यामध्ये अंतिम सामना झाला. पंचायत समिती कर्मचारी संघाने १०१ धावाचा डोंगर उभा केला होता. पोलीस कर्मचारी संघांना १०२ धावाचे एक प्रकारचे आव्हान देण्यात आले होते. सदर क्रिकेट सामन्यामध्ये पोलीस कर्मचारी संघातर्फे महेश वैद्य यांनी २१ चेंडू मध्ये जोरदार फटकेबाजी करत ५४ धावांची खेळी खेळून आपल्या संघाला विजय मिळवून दिला. या सामन्यामध्ये त्यांना सामनावीर म्हणून बहुमान मिळाला. सदर क्रिकेट सामन्यामध्ये अमोल चोरमारे यांना मालिकावीर म्हणून गौरवण्यात आले. पोलीस कर्मचारी संघाच्या वतीने या टीम मध्ये महेश वैद्य, सचिन तिडके,कमलाकर लक्कस, राम मोरे,गंगाधर खरात, अनिल साळुंखे,सचिन कायंदे, सागर शिवरकर, प्रकाश पठाडे, अनंता भुतेकर,बंडू गायकवाड, रमेश माने, प्रदीप गाडेकर, संदीप भागिले,चंद्रकांत म्हस्के, अशोक घोंगे,संदीप गवई,गवई,सुरूशे, झाल्टे, जायभाये, इत्यादी खेळाडू होते. या सर्व खेळाडूचे भोकरदन उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन कटेकर,जाफराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सतीश जाधव, जाफ्राबाद पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चव्हाण, टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास भारती, टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब खार्डे, जाफराबाद पोलीस ठाण्याचे उपनिरीक्षक वसुदेव पवार, पोलीस उपनिरीक्षक राजधर पठाडे यांनी या खेळाडूची कौतुक केले आहे.

# मुदगल येथील प्राथमिक उपआरोग्य केंद्रांची इमारत बनली शोभेची वस्तू

**दैनिक युवक आधार**

**तालुका प्रतिनिधी अशोक नवघरे :** पाथरी/ तालुक्यातील मुदगल येथे प्राथमिक उपआरोग्य केंद्रांची सुसज्ज आधुनिक इमारत उभी राहुनही प्रत्यक्षांत दवाखाना सुरू न झाल्याने मुदगलकरांनी तीव्र नाराजी व्यक्त होत आहे आरोग्य सेवा पोहोचवण्यासाठी उभारण्यात आलेली ही इमारत आजही केवळ शोभेची वस्तू ठरत असून नागरिकांना उपचारासाठी अद्याप ही सोनपेठ पाथरी परभणी येथे भटकंती करावी लागत आहे या प्राथमिक उपआरोग्य केंद्रांचे उद्घाटन खासदार यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात झाले आयुष्यामान आरोग्य उपकेंद्राचे मंदिराच्या धर्तीवर उभारलेल्या या इमारतीत तपासणी कक्ष प्रसूती कक्ष औषध साठा स्वच्छतागृह आदी मूलभूत सुविधा उपलब्ध आहेत मात्र डॉक्टर परिचारिका फामासिस्ट कर्मचारी नियुक्ती आणि नियमित सेवा सुरू करण्याबाबत अद्याप कोणतीही ठोस हालचाल दिसून आली नाही एकीकडे जिल्हा परिषद



निवडणुकीचा धुरळा उडाला असून सर्वच पक्षांचे उमेदवार विकासाची आश्वासने देत आहेत रस्ते पाणी रोजगार त्यावर भाषणे होत असताना मुदगल येथील नागरिकांच्या मूलभूत आरोग्याच्या गरजांकडे मात्र ठळक दुर्लक्ष होत असल्याचे आरोप ग्रामस्थांकडून केले जात आहे ' काम करू, अशी घोषणा ऐकू येते पण हे आरोग्य केंद्र सुरू करून प्रत्यक्ष उपचार देण्याची जबाबदारी कोणाची घेताना दिसत नाही हीच खरी मुदगलकरांची शोकांतिका असल्याची भावना व्यक्त होत आहे आरोग्य केंद्र सुरू नसल्याने गर्भवती महिला जेष्ठ नागरिकांना लहान मुलांना सध्या तपासणीसाठी पाथरी सोनपेठ किंवा परभणी गाठावी लागत आहे आपत्कालीन परिस्थितीत वेळेवर उपचार न मिळाल्यास गंभीर परिणाम भोगावे लागतात पावसाळ्यात तर मुदगल ते वाघाळा फाटा रस्त्यांनी पेंशेटला नेतेवेळी जीव मुठीत धरून या रस्त्यावर प्रवास करावा लागतो वाहतुकीची अडचणी या सर्वांचा फटका ग्रामीण रूग्णांना बसत आहे तर प्रशासनाची उदासीनता कधी संपणार , इमारत उभारणीवर लाखो रुपये खर्च झाले पण मानव संसाधन औषध पुरवठा आणि नियमित वेळापत्रक याबाबत प्रशासनाकडे ठोस निर्णय होताना दिसत नाही एवढी मोठी इमारत उभारण कामे संपली असा दृष्टीकोन आरोग्यासारख्वा अत्यावश्यक सेवेला परवडणारे नाही अशी टीका ग्रामस्थ करत आहेत , तातडीने डॉक्टर व आवश्यक कर्मचारी नियुक्त करावेत औषध साठा व प्रयोगशाळा सुविधा उपलब्ध करून द्याव्यात कमीतकमी आठवड्यातील किमान ठराविक दिवशी तरी सेवा सुरू करावी आरोग्य केंद्राच्या कार्यान्वयनचा आरखाडा जाहीर करावा अशी मागणी होत आहे

# पहेला येथील ग्रामपंचायतची तहकूब ग्रामसभा सभा ठरली वादळी

**ग्रामस्थांनी अनेक विषयाला धरून तहकूब ग्रामसभेत ठराव केले पारित**

**ठरावाची अंमलबजावणी होणार किंवा नाही याकडे संपूर्ण गावकऱ्यांचे लक्ष?**

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे/भंडारा :** तालुक्यातील पहेला येथील तहकूब ग्रामसभा ग्रामपंचायत मध्ये आज दिनांक 4 फेब्रुवारी 2026 ला दुपारी 12 वाजता ग्रामपंचायतच्या परिसरात ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. या ग्रामसभेत ग्रामस्थांनी अनेक विषयावर आवाज उचलून ग्रामपंचायत मध्ये ठराव घेण्यास भाग पाडले. ग्रामपंचायत ची मुदत लवकरच 15 फेब्रुवारीला 2026 संपत असून ही शेवटची ग्रामपंचायतची शेवटची तहकूब ग्रामसभा वादळी ठरली. सभेत ग्रामस्थांनी खालील प्रमाणे विषय मांडले. प्रामुख्याने



नागरी सुविधा अंतर्गत दुकान चाळे बांधकामाची चौकशी करण्यात यावी, जिल्हा विकास निधी अंतर्गत सध्या स्थितीत कॉन्ट्रॅक्टदाराकडून ग्रामपंचायतच्या चाळीचे बांधकाम करण्यात येत असून जिल्हा ग्रामीण विकास निधी कडून कर्ज प्राप्त मंजूर झाल्यानंतर ग्रामपंचायत कडून देयके देण्यात येतील, बस स्टॉप समोरील अतिक्रमण हटविण्याबाबत, मधुबन अमन लॉजिंग यांना नोटीस तामील करण्याबाबत, ग्रामपंचायतच्या अधिनिस्त असलेल्या खाली जागा मोजणी करून ग्रामपंचायतच्या ताब्यात घेण्याबाबत, पंजाब बार ना मंजुरी करिता ग्रामसभेचा ठराव पाठविण्याबाबत, नेहरू वार्ड ते हनुमान मंदिर हायवे पर्यंत सलंगाचे पाणी नारी मध्ये काढण्याबाबत, चाळीसमोरील मच्छी मार्केट हटवून मेश्राम यांच्या घरासमोर नेण्याबाबत, सर्विस रोड वरील सर्व प्रकारचे अतिक्रमण हटविण्याबाबत, ताराबाई बारस्कर, बाळकृष्ण चाचरे, स्वाती अतकरी, यांना घरकुल लाभ देण्याबाबत, डॉक्टर नाकाडे ते फुलचंद बारस्कर पर्यंत सिमेंट रस्ता तयार करण्याबाबत, इस्तारी हजारे ते लोहरापर्यंत सिमेंट नाली बांधकाम करण्याबाबत, लहू बोरकर यांना गाडे मिळण्याबाबत, अशा अनेक विषयावर ग्रामसभेत ठराव सर्वानुमते घेण्यात आले.

सदर ठरावाची अंमलबजावणी होते किंवा नाही याकडे सर्व गावकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# ८८ मांदाड पं.स.तसेच ४४ रहाटाड जि.प. गट निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी विरुद्ध शिवसेना अटीतटीची लढत; कोण मारणार बाजी..?

**दैनिक युवक आधार**

**तळा प्रतिनिधी नितीन लोखंडे :** राज्यामध्ये जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. तळा तालुक्यामध्ये सुद्धा जि.प.आणि पं.समितीच्या निवडणुकीच्या प्रचाराचा धुरळा उडत आहे. तालुक्यातील राजकीय पक्षाचे नेते कार्यकर्ते आपापले पॅनल निवडून आणण्याकरता अहोरात्र प्रयत्न करत आहेत. त्यामुळे मागील काही दिवसात तालुक्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. ४४ रहाटाड जिल्हा परिषद गट नागरिकांचा मागास प्रवर्ग स्त्री करीता आरक्षित असल्यामुळे रहाटाड जिल्हा परिषद गटामध्ये शिवसेनेकडून अधिकृत उमेदवार सौ.रोहीणी रमेश पिंपळे तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून सौ. नलिनी नरेंद्र लोखंडे यांच्यामध्ये थेट लढत होत आहे. त्यामुळे कुणबी विरुद्ध एकमेकांविरुद्ध निवडणुकीच्या रिंगणामध्ये उभे ठाकले आहेत. तसेच 88 मांदाड पंचायत समिती गणामध्ये राष्ट्रवादीचे अधिकृत उमेदवार सौ. रुपाली जगन्नाथ तांडेल विरुद्ध शिवसेनेचे अधिकृत उमेदवार सौ.रोशनी रमेश तांदलेकर यांच्यामध्ये चुरशीची लढत होत आहे. तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीमध्ये शिवसेना विरुद्ध राष्ट्रवादी अशी प्रतिष्ठेची निवडणूक होत आहे. ऐन निवडणुकीच्या तोंडावर मांदाड गणातील राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते तळा पंचायत समिती मा.उपसभापती गणेश वाघमारे, ग्रामपंचायत मांदाड मा.सरपंच तानाजी कालप विद्यमान उपसरपंच अनंत लोखंडे, किसन बालगुडे यांसह अनेक बंडखोरीच्या प्रयत्नात असल्याची माहिती मतदारांना मिळाली. त्यामुळे मांदाड गणातील मतदारांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मांदाड गण पंचायत समितीचे उमेदवार तसेच रहाटाड जिल्हा परिषदेच्या उमेदवारांच्या मतांचे राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे दिसत होती.

परंतु बंडखोरी करणाऱ्या कार्यकर्त्यांची चूक त्यांच्या लक्षात आल्यामुळे चारच दिवसात वापस स्वगृही परतून पुन्हा निवडणुकीच्या प्रचारामध्ये जोमाने कामाला लागले. त्यामुळे मतदानाच्या काही दिवस आधीच मांदाड आणि रहाटाड गणामध्ये राष्ट्रवादीच्या दोन्ही उमेदवारांचे पारडे जड असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.

# चार दिवसात 250 अवैध वाहन पार्किंगवर मालेगाव पोलिसांची धडक कारवाई.!!

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम/गजानन पवार पाटील :** मालेगाव येथे पोलीस स्टेशनचे ठाणेदार राजेश खर्डे यांनी शहरातील वाहतूक पार्किंगला शिस्त लावण्यासाठी काही दिवस समुपदेशन केले तरीही बेशिस्त पार्किंग करणाऱ्या वर काही परिणाम झाला नाही अखेर ठाणेदार राजेश खेरडे ॲक्शन मोडवर येऊन चार दिवसात तब्बल अडीचशे बेशिस्त वाहन पार्किंग सहनियम मोडणाऱ्या वाहनांवर कारवाई केली.

सोमवारी दुपारी बारा वाजता पासून पोलीस स्टेशन ते शेलु फाटा. आणि जोगदंड दवाखाना ते जुन्या पंचायत समिती पर्यंत दोन



पोलीस उपनिरीक्षक व सहा पोलीस कर्मचारी यांच्या पथकाने कारवाईची मोहीम राबवली त्यात बेशिस्त वाहन पार्किंग सह विना नंबर प्लेट ट्रिपल सीट फॅन्सी नंबर प्लेट तसेच वाहतूक नियमाचे उल्लंघन अशा वाहनांवर दंडात्मक कारवाई केली आहे ही कारवाई सुरू असताना इतर रस्त्यावर अवैध पार्किंग तसेच असत्याविस्तर पार्किंगला आळा बसला होता.

# महाराष्ट्र कारागृह व सुधार सेवा विभागाच्या विभागीय क्रीडा स्पर्धांचे थाटात उद्घाटन

**दैनिक युवक आधार**

**राकेश यादव वाडी नागपूर :** महाराष्ट्र कारागृह व सुधार सेवा विभागांतर्गत आयोजित विभागीय कारागृह अधिकारी-कर्मचारी क्रीडा स्पर्धा २०२५-२६ (पूर्व विभाग, नागपूर) यांचा भव्य उद्घाटन समारंभ कवायत मैदान, नागपूर मध्यवर्ती कारागृह (वर्धा रोड) येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या क्रीडा स्पर्धांचे उद्घाटन प्रमुख अतिथी सन्माननीय श्री. डॉ. रवींद्र सिंगल, पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी सन्माननीय श्री. वैभव आगे, कारागृह उपमहानिरीक्षक



(पूर्व विभाग, नागपूर) प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात स्वागत नृत्य व बँड पथकाच्या सादरीकरणाने झाली. त्यानंतर क्रीडा ज्योतीचे प्रज्वलन करण्यात आले. अमरावती येथील कारागृह अधीक्षिका कीर्ती चिंतामणी यांनी प्रास्ताविक करताना क्रीडा स्पर्धांचे महत्त्व विशद केले. स्पर्धांमध्ये घेण्यात येणाऱ्या विविध क्रीडा प्रकारांची माहिती देत, खेळामुळे शारीरिक व मानसिक तंदुरुस्ती कशी वाढते यावर त्यांनी भर दिला.

यावेळी उपमहानिरीक्षक वैभव आगे यांनी पोलीस आयुक्त डॉ. रवींद्र सिंगल यांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. नागपूर मध्यवर्ती कारागृहाच्या अधीक्षिका दिपा आगे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.

प्रमुख पाहुणे डॉ. रवींद्र सिंगल यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणात खेळाडूंची मानसिकता, शारीरिक क्षमता व बौद्धिक विकास यामध्ये खेळांचे अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित केले. अधिकारी-कर्मचारी सदैव तंदुरुस्त कसे राहतील, यासाठी नियमित व्यायाम व खेळांची सवय आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. व्यायामामुळे कार्यक्षमता, आत्मविश्वास व आरोग्य कसे सुधारते याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.

या स्पर्धेत पूर्व विभागातील नागपूर, बुलढाणा, गडचिरोली, भंडारा, चंद्रपूर, वर्धा, अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम तसेच मोर्शी (ओपन प्रिझन) या ११ जिल्हा कारागृहांतील अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले आहेत.

# विवेकानंद विद्यालयात शिस्त, गुणवत्ता आणि कलागुणांचा त्रिवेणी संगम!

**सेलू /प्रतिनिधी शिवाजी पवार :** भारतीय शिक्षण प्रसारक संस्था ही केवळ शिक्षणाचे केंद्र नसून ती शिस्त, गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणारी मातृसंस्था आहे. भारतीय संस्कृतीचे जतन करणारे आणि राष्ट्रहिताला प्राधान्य देणारे सुजाण नागरिक या विद्यालयात घडवले जातात, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे असे प्रतिपादन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या उपाध्यक्षा सौ. ज्योती दीपकसिंह ठाकूर यांनी केले.

विवेकानंद विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. यावर्षी विद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाने 'भारतीय सण-उत्सव' ही संकल्पना घेऊन अतिशय देखणा कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर हरिभाऊ



चौधरी, उपेंद्र बेल्लूरकर, मु.अ.नामदेव एकशिंगे, स्नेहसंमेलन प्रमुख गजानन साळवे आणि सहप्रमुख अश्विनी पावसे यांची प्रमुख उपस्थिती होती.विद्यार्थ्यांनी विविध गाणी आणि नृत्यांच्या माध्यमातून भारतीय संस्कृतीतील वैविध्यपूर्ण सणांचे दर्शन घडवले. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने उपस्थितांची मने जिंकली. सुत्रसंचालन स्वप्नाली देवडे व चंद्रकांत कव्हळे यांनी केले.विवेकानंद विद्यालयाचे सहशिक्षक अनिकेत प्रदीप भिलेगावकर यांनी आपल्या मातोश्रींच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत विद्यालयाला एक शिक्षक कपाट भेट दिले.

# मा. केतन राम भगत यांची पनवेल महानगरपालिका महाविकास आघाडी गटनेतेपदी एकमताने निवड

**दैनिक युवक आधार**

**पनवेल / प्रतिनिधी :** शेतकरी कामगार पक्ष व राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे युवा नेतृत्व असलेले मा. केतन राम भगत यांची महाविकास आघाडीच्या पनवेल महानगरपालिका गटनेतेपदी एकमताने निवड करण्यात आली आहे. ही निवड पनवेल शहरातील लोकशाही मूल्यांना अधिक बळ देणारी ठरली असून, सामान्य जनतेच्या प्रश्नांना प्रभावीपणे वाचा फोडणाऱ्या नेतृत्वाला मिळालेली महत्त्वपूर्ण जबाबदारी आहे.

मा. केतन राम भगत यांच्या या निवडीमुळे पनवेलमधील विकासाभिमुख राजकारणाला नवी दिशा मिळणार असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. युवकांचे प्रश्न, मूलभूत नागरी सुविधा, पारदर्शक प्रशासन व सर्वसमावेशक विकास यासाठी त्यांनी यापूर्वी




केलेले कार्य उल्लेखनीय ठरले आहे.

त्यांच्या नेतृत्वाखाली महाविकास आघाडी पनवेलच्या जनतेसाठी अधिक ताकदीने, एकजुटीने व जबाबदारीने कार्य करेल, असा विश्वास पक्षाच्या कार्यकर्त्यांनी व पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

# आष्टी तालुक्याचे भूषण श्री. मनोरंजन धससाहेब यांना "बीड जिल्हा चंपावती गौरवमूर्ती भूषण पुरस्कार प्रदान

**दैनिक युवक आधार**

**आष्टी(प्रतिनिधी) /बाळासाहेब रकटाटे :** आष्टी तालुक्याचे भूषण, वसुंधरा (पॅटर्न) प्राथमिक शाळेचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी व सामाजिक ,शैक्षणिक क्षेत्रातील सक्रिय आदरणीय श्री. मनोरंजन धससाहेब यांना बीडच्या शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय, सातत्यपूर्ण व आदर्श कार्याबद्दल "बीड जिल्हा चंपावती गौरवमूर्ती भूषण पुरस्कार" प्रदान करून गौरविण्यात आले.

हा सन्मान सोहळा बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री माननीय संजय शिरसाठ साहेब यांच्या शुभहस्ते धससाहेबांना शाल व ट्रॉफी देऊन गौरव करण्यात आला.

मा. श्री. धससाहेब यांनी शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून कार्य करताना केवळ शासकीय जबाबदाऱ्यांपुरते



मर्यादित न राहता शिक्षणाची गुणवत्ता वाढावी, शिक्षक सशक्त व्हावेत व विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी सातत्याने मोलाचे योगदान दिले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिक्षकांचे मार्गदर्शन, पालक-शाळा समन्वय तसेच समाजाभिमुख उपक्रम राबवून त्यांनी अनेक विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणला आहे.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी येथील वसुंधरा (पॅटर्न) प्राथमिक शाळा आज राज्यात नाव लौकिक मिळवलेली आदर्श शाळा म्हणून ओळखली जाते. नाविन्यपूर्ण उपक्रम, शैक्षणिक गुणवत्ता, शिस्तबद्ध वातावरण व विद्यार्थीकेंद्रित शिक्षणपद्धतीमुळे ही शाळा अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरली असून, या यशामागे धससाहेबांची दूरदृष्टी, सकारात्मक नेतृत्व व प्रभावी मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे.

या गौरवप्रसंगी वक्फ बोर्डाचे अध्यक्ष समीर काझी, माजी विधानसभा सदस्य संगीताताई ठोंबरे, शिवसेना बीड जिल्हाध्यक्ष अनिल जगताप (दादा), सचिन मुळूक साहेब, स्वप्निल गलधर साहेब, दैनिक पार्श्वभूमीचे संपादक गंमत भंडारी, दैनिक दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोष मानुरकर साहेब तसेच सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सन्मान स्वीकारताना धससाहेब म्हणाले, "हा पुरस्कार वैयक्तिक नसून माझ्यासोबत कार्य करणाऱ्या शिक्षकवृंद, पालक व विद्यार्थ्यांचा आहे. भविष्यातही शिक्षणाच्या माध्यमातून समाजघडणीसाठी कटिबद्ध राहीन."

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, मान्यवरांचे स्वागत व उपस्थितांचे अभिनंदन अशा विविध उपक्रमांनी हा सोहळा संस्मरणीय ठरला. धससाहेबांच्या या गौरवामुळे आष्टी तालुक्यासह संपूर्ण बीड जिल्ह्यात आनंदाचे वातावरण पसरले असून त्यांच्या पुढील सामाजिक-शैक्षणिक वाटचालीस सर्व स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# श्री राधाकृष्ण,साईबाबा,गणपति मंदिरात श्री साईबाबा उत्सव धार्मिक वातावरणात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**नागोठणे वार्ताहर :** दि. 04 फेब्रुवारी 2026 – येथील गवळ आळीमधील श्री राधाकृष्ण,साईबाबा, गणपति मंदिरात शिवसह्याद्री मित्र मंडळ व ग्रामस्थ मंडळ गवळआळी, यांच्या संयुक्त विद्यमाने सालाबादप्रमाणे यावर्षीही मंगळवार 03 फेब्रुवारी रोजी रामनवमी निमित्त श्री साईबाबा उत्सव मोठ्या धार्मिक वायतावरणात संपन्न झाला.

या धार्मिक कार्यक्रमाची सुरुवात मंगळवार 03 फेब्रुवारी रोजी सकाळी 7.00 वाजता मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष विलास



चौलकर व सौ.श्वेता चौलकर या दापत्यांच्या हस्ते श्री साईबाबा यांच्या मुर्तीवर दुग्धाभिषेक,सकाळी 8.00 वाजता श्री व सौ. समिधा सुदाम घाग यांच्या हस्ते ध्वज पुजन,सकाळी 10.00 श्री व सौ. स्नेहा सुभाष काटले, श्री व सौ.पुष्पा शिवाजी नेरपगार,श्री व सौ.ज्योति संदीप राऊत यांच्या हस्ते सत्यनारायणाची महापूजा,सायं. 3.00 ते 05.00 वा. आरकेएस ग्रामस्थ महिला मंडळ,गवळ आळी यांचे हळदी कुंकू,5.30 ते 6.30 वाजता हरिपाठ, 07.00 ते 09.00 वा. ह.भ.प. हरिष महाराज दिघीकर यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले. या धार्मिक कार्यक्रमाची सांगता रात्री 10.00 वा गोवर्धन पोलसानी यांच्या सौजन्याने महाप्रसाद तसेच आभार प्रदर्शनाने करण्यात आली. या धार्मिक कार्यक्रम व महाप्रसादाचा लाभ नागोठणे शहरासह विभागातील भाविकांनी घेतला असून कार्यक्रम यशस्वी करण्या करिता विश्वस्त मंदिर ट्रस्ट विलास चौलकर,सेक्रेटरी सुदाम घाग, उपाध्यक्ष गणेश घाग,खजिनदार दिनेश घाग,सेक्रेटरी प्रभाकर पाटील, सहसेक्रेटरी विजय चौलकर,कार्याध्यक्ष – प्रसाद जोगत,रविंद्र वाजे व संतोष पाटील यांच्यासह गवळ आळी ग्रामस्थ व महिला मंडळ व सर्व पदाधिकारी-सदस्य यांनी अपार मेहनत घेतली.

# मधु तारा दिव्यांग सेवा सोशल फाऊंडेशनची IIMS हॉस्पिटल, बाणेर (पुणे) येथे सदिच्छा भेट

**दैनिक युवक आधार**

**किशोर गुडेकर :** मधु तारा दिव्यांग सेवा सोशल फाऊंडेशन महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष श्री. नितीनजी शिंदे यांनी बाणेर–बालेवाडी, पॅन कार्ड क्लब रोड येथील IIMS हॉस्पिटलला सदिच्छा भेट दिली. हे हॉस्पिटल धर्मदाय स्वरूपात शासकीय योजनेअंतर्गत गोरगरीब रुग्णांसह लहान बालकांच्या मोफत शस्त्रक्रिया व उपचार करत आहे.

ही भेट पुण्यातील श्री. तुषार जाधव कुटुंबीयांच्या चिमुकल्या बालिकेच्या शस्त्रक्रियेच्या उपचारानिमित्ताने झाली. यावेळी हॉस्पिटलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. श्री. प्रवीणजी गडसिंग तसेच जनसंपर्क अधिकारी श्री. अमोल मोरे यांनी मधु तारा फाऊंडेशनच्या पदाधिकाऱ्यांचे स्वागत केले.



याच वेळी हॉस्पिटलचे ट्रस्टी व पुण्यातील सुप्रसिद्ध डॉक्टर तसेच मधु तारा फाऊंडेशनचे स्नेही डॉ. तोडकर सर यांच्याशी दूरध्वनीद्वारे चर्चा झाली. मधु तारा फाऊंडेशनने दिलेल्या भेटीबद्दल त्यांनीही आनंद व्यक्त करत स्वागत केले.

डॉ. श्री. प्रवीणजी गडसिंग यांनी IIMS हॉस्पिटलमार्फत शासकीय योजनेअंतर्गत मोफत दिल्या जाणाऱ्या विविध उपचार, शस्त्रक्रिया तसेच लहान बालकांच्या विशेष उपचारांविषयी सविस्तर माहिती दिली. तसेच नाशिक येथेही हॉस्पिटलची सेवा उपलब्ध असून तेथेही शासकीय योजनेअंतर्गत मोफत उपचार केले जात असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी मधु तारा फाऊंडेशनच्या प्रमुखांनी, उपचाराअभावी कोणाचाही जीव जाऊ नये व कोणीही उपचाराविना राहू नये, यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध शासकीय आरोग्य योजनांचा लाभ सर्व गरीब व गरजू रुग्णांनी घ्यावा, असे विनम्र आवाहन केले.

# खासदारश्री.श्रीकांत शिंदे यांच्या वाढदिवसानिम्मित फडके पाडा गावात नवीन पाईप लाईन चे भूमिपूजन

**दैनिक युवक आधार**

**रमेश राऊत(कल्याण ग्रामिण प्रतिनिधी) :** कल्याण लोकसभेचे लोकप्रिय संसदरत्न कार्यसम्राट खासदार मा. श्री. श्रीकांत एकनाथ शिंदे साहेब यांच्या वाढदिवसा निमित्ताने दिवा प्रभागसमिती विभागातील फडकेपाडा गावासाठी आधीची ६'' इंच व्यासाची जुनी पाण्याची लाइन खराब अवस्थेत व अपुरा पुरवठा होत असल्याने त्या ठिकाणी ८''इंच नवी पाइप लाइन टाकण्याचे आज ठाणे महापालिका च्या वतीने शुभारंभ करण्यात आले यावेळी स्थानिक नगरसेवक श्री. बाबाजी बाळाराम पाटील साहेब , नगरसेविका सौ.अर्चना निलेश पाटील,नगरसेविका सौ.वेदिका साहिल पाटील ,विभाग प्रमुख



निलेश पाटील, साहिल पाटील, बाळाराम पाटील,शाखा प्रमुख शंकर पाटील शाखाप्रमुख जयंता वाळिलकर, उपशाखा प्रमुख धोंडू निघुकर,तुळशीराम पाटील ,उपशाखा प्रमुख गोवर्धन म्हात्रे ,संजय लाहोत आदी पदाधिकारी कार्यकर्ते व गावकरी महिला उपस्थित होत्या.

# इ-गव्हर्नन्स सुधारणा उपक्रमात पनवेल महापालिका राज्यात प्रथम;शिवसेनेने केला आयुक्त मंगेश चितळे व सहकाऱ्यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 150 दिवसांच्या प्रशासकीय सुधारणा कार्यक्रमांतर्गत राबविण्यात आलेल्या ई-गव्हर्नन्स सुधारणा उपक्रमात पनवेल महानगरपालिकेने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला त्याबद्दल शिवसेना पनवेल शहरप्रमुख प्रसाद सोनावणे यांच्या नेतृत्वात पनवेल शहर शिवसेनेकडून पनवेल महानगरपालिका आयुक्त तसेच प्रशासक मंगेश चितळे व त्यांच्या सहकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.




नागपूर, पुणे, पिंपरी-चिंचवड, नवी मुंबई यांसारख्या मोठ्या आणि अनुभवी महानगरपालिकांशी थेट स्पर्धा असतानाही पनवेल महापालिकेने अव्वल स्थान मिळवून राज्यभरात आपली छाप पाडली आहे. ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत महानगरपालिकेचे संकेतस्थळ अधिक सुलभ, सुरक्षित आणि अद्ययावत करणे, नागरिकांसाठी प्रभावी डिजिटल डॅशबोर्ड विकसित करणे, 'आपले सरकार' अंतर्गत विहित वेळेत सेवा देणे, कार्यालयीन कामकाजात ई-ऑफिसचा व्यापक वापर, व्हॉट्सअॅप चॅटबोट, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तसेच जीआरएस प्रणालीचा प्रभावी अवलंब अशा विविध घटकांचा समावेश करण्यात आला होता.हे उल्लेखनीय यश आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वामुळेच मिळाले आहे. आयुक्त चितळेंसह परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, संगणक विभागाचे उपायुक्त स्वरूप खारगे तसेच संबंधित विभागप्रमुख आणि कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम करत हे यश मिळवले. विशेष म्हणजे, यापूर्वी १०० दिवसांच्या प्रशासकीय सुधारणा कार्यक्रमात पनवेल महानगरपालिकेने तिसरा क्रमांक पटकावला होता. त्यानंतर १५० दिवसांच्या कार्यक्रमात थेट प्रथम क्रमांकावर झेप घेत प्रशासनाचा कायापालट पनवेलने प्रत्यक्षात उतरवला आहे. या स्पर्धेत राज्यातील एकूण 29 महापालिकांनी सहभाग नोंदविला होता. यावेळी शिवसेना पनवेल उपमहानगर संघटक राहुल गोगटे, शहरप्रमुख प्रसाद सोनावणे, शहर संघटक अभिजीत साखरे, उपशहरप्रमुख शैलेश जगनाडे, अर्जुन परदेशी, प्रभाग १४ विभागप्रमुख अॅड. आशिष पनवेलकर, सिद्धेश पवार, महिला उपशहरप्रमुख सौ. अर्चना जाधव आदी उपस्थित होते.

# खांदा कॉलनीत सिडको कडून दुषित पाण्याचा पुरवठा नागरिकांनी केली चिंता व्यक्त

**दैनिक युवक आधार**

**खांदा कॉलनी प्रतिनिधी :** खांदा कॉलनीत सिडको कडून पुरवल्या जाणाऱ्या पाण्यामध्ये लाल किडे आढळून येत असल्याची माहिती काही नागरिकांन कडून व्यक्त होत आहे त्यामुळे हे पाणी पिताना नागरिकांनी काळजी घ्यावी असे आवाहन विविध सोशल मीडिया द्वारे व्यक्त केली जात या संबंधी सिडको अधिकाऱ्यांना तक्रार दिली आहे या संबंधी सिडको काय कारवाई करते असे असले तरी हे पाणी पिताना काळजी घ्यावी असे आवाहन केले जात आहे विशेष करून हे पाणी साध्या



नळातून निघताना दिसत आहे लाल किडे नळातून येणाऱ्या पाण्यातून सहज दिसत आहेत असा आरोप खांदा कॉलनीतल नागरिकांनी केला आहे.

# सेवानिवृत्ती म्हणजे नवीन पर्वाची सुरुवात - अॅड.किरणराव सरनाईक

**दैनिक युवक आधार**

**रिसोड(प्रतिनिधी)/रणजितसिंह. ठाकुर :** सेवानिवृत्ती हा सेवेचा शेवट नसून नवीन पर्वाची सुरुवात असल्याचे मत अॅड.किरणराव सरनाईक यांनी रिसोड येथील श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालया मध्ये आयोजित सेवानिवृत्ती निमित्त निरोप समारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलत असताना व्यक्त केले.

येथील श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये सेवानिवृत्त झाल्याबद्दल ग्रंथपाल बापूसाहेब सरनाईक व सेवक गुणवंतराव सरनाईक यांना निरोप देण्यात आला. या निरोप समारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्था वाशिम चे अध्यक्ष तथा अमरावती विभागाचे शिक्षक आमदार अॅड.किरणराव सरनाईक हे होते तर प्रमुख उपस्थितांमध्ये स्थानिक शाळा समितीचे जेष्ठ संचालक पंजाबराव देशमुख, जितेंद्रकुमार दलाल, वाशिम जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष विनोद नरवाडे, रिसोड तालुका मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष साहेबराव जाधव, प्राचार्य दिनकर सरकटे, प्राचार्य सज्जन बाजड, प्राचार्य सावसुंदर, रिठद येथील प्राचार्य विजय ढेंगळे, रिसोड चे प्राचार्य संजय देशमुख, उपप्राचार्य संजय नरवाडे, पर्यवेक्षक गजानन भिसडे, माजी प्राचार्य डॉ.के.बी.देशमुख, शिवाजी मराठी प्राथमिकचे मुख्याध्यापक सचिन देशमुख, शिवाजी उर्दू प्राथमिकचे मुख्याध्यापक अनिस खान, सेवानिवृत्त ग्रंथपाल बापूसाहेब सरनाईक, सेवानिवृत्त सेवक गुणवंतराव सरनाईक व त्यांच्या परिवारातील सदस्य उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रतिमा पूजन व दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने मंचावरील मान्यवरांचा सत्कार करण्यात



आला. याप्रसंगी सेवानिवृत्त ग्रंथपाल बापूसाहेब सरनाईक व गुणवंतराव सरनाईक यांचा सपत्नीक शाल-श्रीफळ, साडीचोळी व भेटवस्तू देऊन शाळेच्या वतीने सन्मान करण्यात आला, तसेच अमरावती विभागीय शिक्षक संघाचे संस्थापक अध्यक्ष या नात्याने आमदार किरणराव सरनाईक यांनी या दोन्ही सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा शाल व श्रीफळ देऊन सन्मान केला. पुढे बोलताना किरणराव सरनाईक म्हणाले की बऱ्याच जणांना असे वाटते की आता आपण सेवानिवृत्त झालो म्हणजे आपल्या जबाबदाऱ्या कमी झाल्या, मात्र सेवानिवृत्ती ही नवीन पर्वाची सुरुवात असल्यामुळे आपल्या सेवेच्या कालावधीत आपण सामाजिक व कौटुंबिक जबाबदारी पासून थोडे दुरावलेले असतो आता त्या जबाबदाऱ्या वाटून घेऊन समाजासाठी व कुटुंबासाठी आपण काहीतरी देणे लागतो या भावनेने कार्यरत राहावे असे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. याप्रसंगी श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे स्थानिक शाळा समिती संचालक पंजाबराव देशमुख, वाशिम जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष विनोद नरवाडे यांची समायोचित भाषणे झाली. सत्काराला उत्तर देताना दोन्ही सत्कारमूर्तींनी आपला सेवेचा काळ कसा गेला यावर प्रकाश टाकला तसेच यावेळी संस्थेचे सर्व पदाधिकारी तसेच सोबत काम करणाऱ्या सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य संजयराव देशमुख यांनी केले यावेळी प्राचार्य देशमुख यांनी आपल्या सेवा काळामध्ये या दोन्ही सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी शाळेची व संस्थेची कशाप्रकारे सेवा केली तसेच आपल्या कामाप्रती सेवाभाव दाखवला त्याबद्दल गौरवोद्गार काढले, कार्यक्रमाचे संचलन डिगांबर पाचरने यांनी केले तर आभार प्रा.विजय देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य दिले.